
# रामतीर्थचरित्र



IRBK-0103459

IRBK-0103459

केशव भिकाजी

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय [illegible]
दा. क्र. ३४५९

मूल्य सहा आणे

सुबोध

# रामतीर्थ चरित्र

अनुक्रम २५८३२
विभाग
क्रमांक २७७९
नों. दि.

लेखक

विष्णु विनायक करमरकर, बी. ए., एल्‌एल्‌. बी.

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा,
वा. क्र. ३४५९ नों दि
वि. बा. वा.

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

IRBK-0103459

IRBK-0103459

मूल्य सहा आणे

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन )

प्रथमावृत्ति : १९३३
पुनर्मुद्रण : १९४२, १९५०

मुद्रक : श. वि. दिवेकर, कल्पना प्रिंटिंग प्रेस, दादर, मुंबई १४
प्रकाशक : केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ-सदन, गिरगांव, मुंबई ४

# किंचित् दिग्दर्शन

स्वामी रामतीर्थांचीं अनेक चरित्रें अनेक भाषांत प्रसिद्ध झालेली आहेत. त्यांचीं व्याख्यानेंही अनेक भाषांत प्रसिद्ध झालेलीं आहेत. तीं वाचलीं असतां स्वामींविषयीं अत्यंत आदर उत्पन्न होतो. संत तुकाराम, रामदास वगैरेंनीं पूर्वीच्या काळांत आपल्या ग्रंथांनीं सुंदर बोध करून चांगलें वळण लावून दिलें.

हल्लींचा काळ इंग्रजी विद्येचा व पश्चिमेकडील सुधारणेचा आहे. हल्लींच्या मंडळींच्या मनावर इंग्रजी विद्येचा व पश्चिमेकडील सुधारणेचा बराच पगडा बसलेला आहे. अशा वेळीं **श्रीस्वामी रामतीर्थ** यांच्या चरित्राचा व त्यांच्या उपदेशाचा परिणाम जास्त होणार. कारण स्वामी रामतीर्थ जसे वंदनीय भक्तशिरोमणि व जीवन्मुक्त विभूति होते, तसेच ते इंग्रजी विद्येंतील सर्वांत मोठी पदवी एम्. ए. ती पहिल्या वर्गांत पहिले येऊन पटकावणारे होते. त्यांनीं आपल्या हिंदी भाषेंतील व्याख्यानांनीं हिंदुस्थानला मोहित केलें होतें, त्यांनीं आपल्या परशिअन भाषेंतील व्याख्यानांनीं इजिप्तमधील महंमदी बंधूंना मोहित केलें होतें, आणि आपल्या इंग्रजी भाषेंतील व्याख्यानांनीं जपान व विशेषतः अमेरिका या देशांकडून धन्य म्हणवून घेतलें होतें. अमेरिकेंत दोन अडीच वर्षें राहून त्यांनीं सनातन धर्माचें बोधामृत अमेरिकन बंधुभगिनींना आकंठ पाजलें. त्यांच्या ऋषितुल्य राहणीनेंही ते अमेरिकेला वंदनीय झाले.

अशा विभूतीचें छोटें चरित्र सोप्या भाषेंत लिहून बालमित्रांना व साधारण बंधुभगिनींना अर्पण करावें असें वाटलें व तें ईश्वरकृपेनें आज घडून आलें. हें छोटें चरित्र लिहिण्याच्या कामीं दिल्लीचे श्री. अमीरचंद आणि मुंबईचे श्री. फडके व श्री. भावे यांच्या पुस्तकांचा मला बराच उपयोग झाला. याबद्दल या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहें.

शेवटीं परम मंगल दयाळू परमेश्वर माझे बाळमित्र व बंधुभगिनी यांना हें चरित्र वाचून सदाचरणी, धर्मशील, कर्तृत्ववान देशसेवक बनवो अशी त्या जगच्चालकाची अत्यंत नम्रभावानें प्रार्थना करून हें '**किंचित् दिग्दर्शन**' पुरें करितों.

**विष्णु विनायक करमरकर**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | जन्म व बालपण ... ... | ५ |
| २ | शिक्षण ... ... ... | ७ |
| ३ | गृहस्थाश्रमाची पूर्व तयारी ... | १५ |
| ४ | तीर्थरामांचा गृहस्थाश्रम ... | १८ |
| ५ | वानप्रस्थाश्रम ... ... ... | २४ |
| ६ | संन्यास ... ... ... | ३० |
| ७ | परद्वीपगमन व पृथ्वीप्रदक्षिणा ... | ३३ |
| ८ | शेवटचा संसार ... ... | ३९ |
| ९ | गंगामातेला देहसमर्पण ... ... | ४२ |
| १० | रामतीर्थ सूक्तिसुधा ... ... | ४५ |
| ११ | पुनरागमनाय च ... ... | ५२ |


# सुबोध
# रामतीर्थचरित्र

## १ जन्म व बाळपण

पांच नद्यांनीं आपल्या आपानें म्हणजे पाण्यानें ज्या प्रांताला पवित्र व संपत्तिमान केलें आहे तो **पंजाब** (पंच + आप). हा पंजाबप्रांत आपल्या हिंदुस्थानचे अगदीं उत्तरेस आहे. हा काश्मीर म्हणजे हिंदुस्थानचें नंदनवन याच्याजवळ आहे. हजारों वर्षांपूर्वी आर्य ऋषि या देशाला अतिशय पवित्र धर्मभूमि मानीत असत. अजूनही मोठे पुण्यवान धर्मात्मे या प्रांतांत जन्म घेतात. अशा या पुण्यभूमींत म्हणजे **पंजाबांत गुजरणवाला** म्हणून एक जिल्हा आहे. त्या जिल्ह्यांत **मुरलीवाला** नांवाचें एक सुंदर पण चिमुकलें गांव आहे. त्या गांवीं **हिरानंद गोस्वामी** नांवाचे ब्राह्मण राहात असत. सुप्रसिद्ध साधु **तुलसीदास** यांच्या वंशांत **हिरानंदांचा** जन्म झालेला होता. या **तुलसीदासांनींच** हिंदी भाषेंत रामायण हा ग्रंथ रचिला आहे. **तुलसीदासांना** त्यांच्या रामप्रेमावरून वाल्मीकि ऋषींचे अवतार असें समजतात.

हिरानंद हे धर्मशील व सरळ मनाचे होते. ते पेशावर व स्वात या प्रांतांतील गृहस्थांकडे उपाध्येपणा करून कसें बसें पोट भरीत असत. त्यांच्या घरची फार गरिबी होती. अशा या सरळ स्वभावाच्या गरीब ब्राह्मणाला इ. स. १८७३ त ऑक्टोबर महिन्याचे बाविसावे तारखेस एक मुलगा झाला. तोच आपला चरित्रनायक **स्वामी रामतीर्थ**. या बाळाचे जन्माची वेळ फार विलक्षण होती. त्या वेळची या बाळाची ही पहा जन्मकुंडली—

## रामतीर्थांची कुंडली




या कुंडलीवरून या बाळाला मातेचें सुख नाहीं, याला पुष्कळ श्रीमंत होण्याची इच्छा नसणार, याला मीपणा बिलकूल शिवणार नाहीं, हा मोठा उदार महात्मा होईल व लोकांमध्यें फार बोकाळलेला आपलपोटेपणा व पैशाचा अतिशय लोभ कमी करील व सर्व जगांतील लोकांना बंधुभावानें एकमेकांवर प्रेम करावयास शिकवील व सर्व लोकांना सर्व जगाचा नाथ जो परमेश्वर त्याचेवर प्रेम करायला शिकवील. सर्व जगांत प्रेमधर्माचें राज्य स्थापन करणें हेंच आपलें जन्मकर्म असें हा मानील व तें साध्य करण्यासाठीं आपलें सर्व आयुष्य खर्च करील, असें भविष्य ज्योतिषीबुवांनीं कथन केलें.

वाईट भविष्य अगोदर व हटकून खरें होतें म्हणतात, तसेंच झालें. **रामतीर्थांची** माता, त्यांचा जन्म झाल्यावर थोडेच दिवसांनीं मरण पावली, यामुळें बिचाऱ्या **रामतीर्थांना** गाईच्या दुधावर राहावें लागलें. आई मेल्यामुळें रामतीर्थांचा संभाळ करण्याचें काम त्यांच्या आतेकडे आलें. तिनें अतिशय प्रेमानें स्वतःच्या पोटच्या मुलाप्रमाणें रामतीर्थांचें पालन पोषण केलें. रामतीर्थही मातेप्रमाणें तिच्यावर प्रेम करीत व तिच्या मागें मागें असत. या बाई रोज रामायण, महाभारत, वगैरे धार्मिक ग्रंथांवरील पुराणें ऐकावयास जात.

रामतीर्थही आतेबरोबर पुराण ऐकत व तें त्यांना इतकें आवडे व त्यांच्या इतकें मनांत ठसे कीं घरीं आल्यावर धर्मशाळेंत ऐकलेलें पुराण ते आपल्या सोबत्यांना व नातेवाईकांना रसाळ वाणीनें सांगत. या पुराणश्रवणाची त्यांना इतकी गोडी लागली कीं शाळेला सुटी झाली रे झाली कीं हे धर्मशाळेंत पुराण ऐकायला जात. यामुळें एक फायदा असा झाला कीं त्यांना आपल्या धर्माची व आपल्या धर्मग्रंथांची चांगली माहिती मिळाली व धर्मग्रंथांतील सदुपदेश कानावर पडून त्यांचें वर्तन व स्वभाव चांगला झाला. पण एक तोटाही झाला.

पुराणावरील प्रेमामुळें, उघड्या मैदानावर खेळावयाचे धूमधडाक्याचे खेळ ते खेळले नाहींत, यामुळें त्या खेळांमुळें इतरांचीं शरीरें कणखर व सशक्त बनतात तसें त्यांचें शरीर बनलें नाहीं. यामुळें व अगदीं बाळपणापासून आईचें दूध न मिळाल्यामुळें हे लहानपणीं अतिशय अशक्त होते.

**स्वामी रामतीर्थ** जरी रामतीर्थ या नांवानें सर्व जगांत प्रसिद्ध आहेत, तरी तें कांहीं त्यांचें पाळण्यांतलें नांव नाहीं. त्यांचें पाळण्यांतलें नांव **तीर्थराम** असें होतें. पुढें जेव्हां ते थोर संन्यासी झाले तेव्हां स्वामी रामतीर्थ हें नांव त्यांना प्राप्त झालें. यासाठीं यापुढें आपण त्यांना **तीर्थराम** या पाळण्यांतल्या नांवानें ओळखूं.

---

## २ शिक्षण

तीर्थराम पांच वर्षांचे झाले तेव्हां त्यांना त्यांचे वडील **हिरानंद** यांनीं मुरलीवाला येथील उर्दु शाळेंत घातलें. आपल्या महाराष्ट्र देशाची मायभाषा मराठी. यामुळें आपण लहानपणीं मराठी शाळेंत जाऊन ‘ श्रीगणेशा ’ चा धडा घेतों. पण तीर्थराम कांहीं आपल्या महाराष्ट्रांत राहात नव्हते. ते पंजाबप्रांतांत राहात होते. पंजाबप्रांताची मायभाषा उर्दु. हिंदु व मुसलमान पंजाबांत उर्दु भाषाच घरींदारीं बोलतात.

लहान मुलांचें शिक्षण ही उर्दु भाषेंतूनच सुरू होतें, यामुळें तीर्थरामांना उर्दु शाळेंत घातलें. त्या शाळेचे हेडमास्तर मौलवी महमदीन हे होते. ते फार हुशार होते.

तीर्थरामाला उर्दु भाषा फार आवडे. त्या शाळेंत त्याचा नंबर नेहमीं अगदीं वर असे. त्याच्या बुद्धिवैभवावर व मेहनत घेऊन झटून अभ्यास करण्यावर मौलवीसाहेब फार खूष असत. त्यांच्या शाळेंत तीर्थराम आपल्या वयाच्या दहाव्या वर्षापर्यंत होता. नंतर तेथील शिक्षण पुरें झाल्यावर तो इंग्रजी शिकण्यासाठीं **मुरलीवाला** येथून **गुजरणवाला** या जिल्ह्याच्या ठिकाणीं गेला. त्या वेळेला आपला प्रिय शिष्य जाणार म्हणून मौलवीसाहेबांना साहजिकच वाईट वाटलें.

## इंग्रजी शिक्षण

तीर्थराम इंग्रजी शाळेंत गेले तेव्हां फार लहान होते. शिवाय इंग्रजी शाळा परगांवीं असल्यामुळें त्यांना आईप्रमाणें प्रेम करणाऱ्या आपल्या आतेला सोडून जावें लागलें. परंतु विद्येची आवड असल्यामुळें त्यांनीं तें आनंदानें पतकरलें. शिकण्यासाठीं आपल्या मुलांना परगांवीं ठेवायची वेळ आली म्हणजे आईबापांच्या पोटांत धस्स होतें. परगांवीं आपल्याप्रमाणें आपल्या मुलाची काळजी कोण घेईल, त्याला वाईट संगतीपासून दूर कोण ठेवील, तो अभ्यास करतो का उनाडक्या करतो हें कोण लक्ष देऊन पाहील, त्याच्या खाण्यापिण्याची कोण व्यवस्था ठेवील, दुखण्या-वाण्यांत त्याला औषधपाणी कोण देईल, त्याचें पर ठिकाणीं कसें वर्तन राहील, असे एक ना दोन, असंख्य प्रश्न त्यांच्या मनांत काहूर करून सोडतात.

बिचाऱ्या हिरानंदांची अशीच अवस्था झाली असल्यास नवल नाहीं. पण इतक्यांत त्यांच्या सुदैवानें त्यांच्या मनापुढें त्यांचे मित्र **संत धन्ना भगत** यांची मूर्ति उभी राहिली. हे **धन्ना भगत** व्यवहार-कुशल अशा संतरत्नमालेंत पहिल्या स्थानीं शोभण्यासारखे होते.

बाळ **रामलक्ष्मणांना** आपल्यापासून दूर पाठवावयाचें **दशरथ** राजाच्या जिवावर आलें. पण '**विश्वामित्र** ऋषींसारखे पालक असल्यावर रामलक्ष्मणांविषयीं काळजी वाहाण्याचें राजा, तुला कांहींच कारण नाहीं.' असें वसिष्ठ मुनींनीं समजावून सांगितल्यावर दशरथानें आनंदानें रामलक्ष्मणांना विश्वामित्र ऋषींच्या हवालीं केलें; तसेंच येथें झालें.

संत धन्ना भगत किती थोर आहेत हें हिरानंदांना ठाऊक होतेंच. यामुळें दशरथाप्रमाणेंच हिरानंदांनीं आनंदानें तीर्थरामांना धन्ना भगतांच्या स्वाधीन केलें आणि तेंच योग्य झालें. **तीर्थरामांचे** जगाला वंदनीय व मार्गदर्शक **स्वामी रामतीर्थ** झाले याचें श्रेय धन्ना भगत यांनाच दिलें पाहिजे, असें आमच्याप्रमाणें प्रत्यक्ष स्वामी रामतीर्थांचेंही मत होतें. असो. आपले **तीर्थराम** इ. स. १८८३ त इंग्लिश शाळेंत गेले व दरवर्षी उत्तम तऱ्हेनें पास होत १८८८ त मॅट्रिक पास होऊन शाळेंतून बाहेर पडले. त्या शाळेंतून त्यांच्याबरोबर पास झालेल्या मुलांत त्यांचा नंबर पहिला आला व सर्व **पंजाबप्रांतांतही** त्यांचा नंबर पहिला आला. घरची गरिबी असतां व प्रकृतिही जन्मापासून अशक्त असतां इतकें सुंदर यश पहिल्या फटक्याला **तीर्थरामाला** लाभलें याचें कारण त्याची अभ्यास करण्याची आवड, मेहनत करण्याची तयारी व **संत धन्ना भगत** यांची उत्तम देखरेख. इतपर्यंत सर्व ठीक झालें.

## पण पुढें काय

हा प्रश्न तीर्थरामाचें चिमुकलें मन भंडावून सोडूं लागला. तो या वेळीं सारा पंधरा वर्षांचा होता. या बालवयांत त्यानें हा प्रश्न कसा सोडवावा ? बापाचें म्हणणें, आपली घरची गरिबी, कॉलेज – शिक्षणाचा खर्च फार व कुटुंबाला उत्पन्नाच्या मदतीची अत्यंत जरुरी, यासाठीं **तीर्थरामानें** मिळेल ती नोकरी धरून कुटुंबाला पैशाची मदत करावी. इकडे **तीर्थरामाला**, त्याच्या गुरुजींना आणि धर्मगुरु व पालक **संत धन्ना**

भगत यांना वाटे कीं त्यानें आपल्या बुद्धीचें चीज होण्यासाठीं कॉलेजांत जावें व बी. ए. आणि एम्. ए. मध्यें हिऱ्याप्रमाणें चमकत पास व्हावें.

## धन्ना भगतांचा विजय

शेवटीं **संत धन्ना भगत** यांच्या मताप्रमाणें तीर्थरामांनीं सन १८८९ त पंजाब प्रांताची राजधानी **लाहोर** येथें जाऊन तेथील फोरमन ख्रिश्चन कॉलेजमध्यें आपलें नांव दाखल केलें. यामुळें त्याच्या वडिलांना राग आला व यापुढें मजकडून तुला एक पैचीही मदत होणार नाहीं असें त्यांनीं बिचाऱ्या तीर्थरामाला निक्षून सांगितलें, इतकेंच नव्हे तर अभ्यास करण्याच्या कामीं अडथळा व्हावा व त्यांनीं संसारपाशांत गुंतावें म्हणून त्यांनीं तीर्थरामाच्या बायकोला त्याचेकडे राहावयास पाठवून दिलें.

## तीर्थरामाचा मनोनिग्रह

इतकें वडिलांनीं केलें तरी तीर्थराम त्यांचेवर रागावला नाहीं, किंवा उलटपक्षीं त्यांच्या युक्तीला बळी पडून अभ्यास आणि कॉलेज सोडून संसारीही बनला नाहीं. आपलेकडे पाठविलेल्या बायकोला त्यानें परत पाठविलें नाहीं, तिला घेऊन तो बिऱ्हाड करून राहिला, पण त्यानें आपला अभ्यास किंवा कॉलेज सोडलें नाहीं. त्याला एकट्याला पुरेल एवढी स्कॉलरशिप त्याच्या हुशारीवर त्याला मिळत होती, पण आतां सर्व बिऱ्हाडाचा खर्च त्याला भागवावयाचा होता. त्यासाठीं त्यानें शिकवण्या धरल्या व धीर धरून नेटानें आपला अभ्यास चालू ठेवला.

## पत्नीची सहकारिता

त्याची बायकोही त्याच्याप्रमाणें सुशील होती. त्याचे बेत व हेतु सिद्धीस जावे म्हणून ती त्याला मनोभावानें सर्व प्रकारची मदत करीत असे. ती त्याचें मन अभ्यासावरून आपलेकडे किंवा संसाराकडे ओढून घेत नसे, यामुळें त्याचें जीवन सुखमय झालें. त्याला आपले बायको-

विषयीं प्रेम व आदर वाटत असे. पण इतर लोक फक्त बायकोवर प्रेम करतात व इतरांविषयीं विलकूल काळजी घेत नाहींत तसें तीर्थरामांचें नव्हतें.

क्रमांक २०९२ नों. दि. ११/२/६०

## प्रेमाविषयीं विचार

ते म्हणत, आपल्या बायकोवर व आपल्या मुलांवर आपलें जें प्रेम असतें तें नमुन्याप्रमाणें पुढें ठेवून आपण जगांतील सर्व बंधुभगिनींवर तसेंच प्रेम ठेवावें. आपली बायको व मुलें हीं आपल्या जगावरील प्रेमाचा मध्यबिंदु असावीं. असो, तीर्थरामाची एक वर्ष परीक्षा पाहून बायकोच्या मोहानेंही हा विद्या व कॉलेज यांना सोडून देत नाहीं असें पाहून हिरानंदांनीं तीर्थरामांच्या बायकोला त्याचेकडून पुनः मुरलीवाला येथें आपल्याकडे आणलें.

## पहिला नंबर कां आला ?

इतकी गरिबी, इतकी अशक्त प्रकृति व इतका वडिलांचा विरोध असतां तीर्थराम प्रत्येक परीक्षेंत उत्तम तऱ्हेनें पास होत गेला, याचीं अनेक कारणें आहेत. बाळांनो, तुम्ही विद्यार्थी आहां आणि हें चरित्र मी तुमचेसाठीं लिहीत आहें. यामुळें तीर्थरामांच्या नमुनेदार विद्यार्थिदशेविषयीं अधिक सविस्तर माहिती तुम्हाला दिली पाहिजे, कारण ती माहिती तुम्हांला तुमचें कोठें चुकतें आणि तुम्हांला कोणते बाबतींत सुधारणा केली पाहिजे तें शिकवील. तीर्थरामाला प्रत्येक परीक्षेंत उत्तम यश आलें याचें —

**पहिलें कारण** त्याची —

## देवभक्ति.

‘**प्रयत्नान्तीं परमेश्वर**’ हें त्याचें ब्रीदवाक्य असे. परमेश्वरावर अढळ विश्वास ठेवून व त्याला स्मरून आपलें कर्तव्य करीत राहावयाचें हा तीर्थरामाचा धर्म. हा धर्मोपदेश लहानपणीं त्याच्या आतेबरोबरच्या

**पुराणश्रवणानें** त्याला प्राप्त झाला व तो पुढें वंदनीय वसिष्ठ ऋषींप्रमाणें थोर असे जे त्याचे धर्मगुरु **संत धन्ना भगत** यांच्या उपदेशानें आणि संगतीनें त्याच्या मनांत पक्का बिंबला. देवावरील त्याचें प्रेम बाळपणापासून वाढत गेलें व शेवटीं तो **देवाशीं एकरूप** बनला.

त्याच्या उत्तम यशाचें **दुसरें कारण** त्याची —

## गुरुभक्ति.

अलीकडच्या विद्यार्थ्यांचें वर्तन कधीं कधीं वाईट झालेलें दिसतें व त्यामुळें त्यांना परीक्षेंत उत्तम यश प्राप्त होत नाहीं. याचें कारण त्यांच्या मनांत गुरुभक्ति नसते हें होय. तीर्थराम जरी इतका हुशार होता, जरी तो प्रत्येक परीक्षेंत पहिला आला, व गणितासारखा कठीण विषय घेऊन अत्यंत कठीण पेपर आले असतांही त्यानें बी. ए. च्या परीक्षेंत पहिल्या क्लासांत पहिला नंबर पटकावून सर्व हिंदुस्थानला दिपवून टाकलें, व उत्तम तऱ्हेनें एम्. ए. होऊन धन्य धन्य म्हणवून घेतलें, तरी त्याचे लहानपणचे अगदीं हलका म्हणजे **तांबटाचा धंदा करणारे,** इंग्रजीचा गंधही नसलेले **गुरुजी धन्ना भगत** यांचेविषयींची त्याची **भक्ति** तिळमात्रही कमी झाली नव्हती. त्यांना तो देवाप्रमाणें पूज्य मानीत असे. सर्व कामांत नम्रतेनें त्यांचें मत व सल्ला घेत असे. त्यांना तो वारंवार पत्र लिहीत असे व त्यांचें पत्र सहज आलें नाहीं तर आपल्या हातून कांहीं तरी अपराध झाला असें समजून तो आपण होऊन गुरुजींची अत्यंत नम्रपणें क्षमा मागत असे.

तीर्थरामांच्या उत्तम यशाचें **तिसरें कारण** त्यांचा —

## सात्त्विक आहार.

ते पंजाबी होते तरी दूध व भात हेंच त्यांचें मुख्य अन्न असे. पुढें पुढें तर ते नुसत्या दुधावर राहात असत. या संबंधानें ते आपल्या '**गणितांत प्रवीण कसें व्हावें ?**' या निबंधांत म्हणतात,

'Over-loading the stomach with greasy and rich stuffs makes even an intelligent student unfit and dull, while on the other hand, light food always gives free and uncongested brain, which forms the secret of a successful student life.'

याचा अर्थ—**तेलकट, तळकट व मिष्ट अन्न ओ येईपर्यंत खाल्ल्यानें हुशार विद्यार्थी देखील मट्ट व कुचकामाचा बनतो. याच्या उलट, हलकें अन्न सेविल्यानें मेंदु तरतरीत व चलाख बनतो आणि हेंच विद्यार्थिदशेंतील यशाचें खरें रहस्य आहे.**

**चौथें कारण** त्यांची —

## आनंदी मनोवृत्ति.

कितीही संकटें आलीं, पुस्तकें घेण्यांत पैसे खर्च होऊन कित्येक दिवस जरी अर्धपोटीं राहावें लागलें, अन्यायानें कठोर शब्दांनीं जरी इतरांनीं निंदा केली तरी त्यांची आनंदी मनोवृत्ति आणि त्यांच्या सुंदर व मनोहर मुखावरील हास्य कधींही तिळभरही कमी होत नसे. **आनंदी मन हें यशाची जननी** आहे असें अनेक थोर पुरुषांनीं म्हटलें आहे तें अगदीं बरोबर आहे असें तीर्थरामांच्या उदाहरणावरून दिसून येतें.

**पांचवें कारण** त्यांची —

## सतत श्रम करण्याची तयारी.

'**किंमत द्या म्हणजे जिन्नस मिळेल**' अशी एक इंग्रजींत म्हण आहे. तिचा अर्थ हाच कीं जितकी जितकी मेहनतरूपी किंमत जास्त द्याल तितका तितका फळरूपी अधिक चांगला जिन्नस मिळेल. हल्लींचे विद्यार्थी मोठीं पुस्तकें वाचायला कंटाळतात. त्यांना छोट्या नोटस् ( टिपणी ) पाहिजेत म्हणजे थोड्या श्रमांत घोकंपट्टी करून पास. पण अशानें खरें ज्ञान लाभत नाहीं व परीक्षाही पुष्कळदां पास होत नाहीं.

तीर्थराम किती कष्ट करून विद्या संपादन करीत होता हें स्पष्ट कळावें, म्हणून त्याचें वेळापत्रक तुम्हापुढें ठेवतों, हें पाहा —

## तीर्थरामाचें वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| पहाटे | ५ ते ७ | अभ्यास. |
| | ७ ते ८ | स्नान व व्यायाम. |
| | ८ ते ८॥ | प्रोफेसरांकडे जाणें. |
| | ८॥ ते ९॥ | प्रोफेसरांबरोबर वाचन. |
| | ९॥ ते १०॥ | जेवण व कॉलेजांत जाणें. |

नंतर कॉलेजांतील शिक्षण, घरीं चालत जाणें, रावी नदीच्या कांठीं फेरफटका, नंतर शहराच्या बगीचांत फिरणें, घरीं हिंडत वाचणें व संध्याकाळची तालीम — १०॥ – ५॥.

| | | |
|---|---|---|
| संध्याकाळीं | ५॥ — ७ | अभ्यास. |
| | ७ — ८ | जेवण व थोडा हलका व्यायाम. |
| | ८ — १० | अभ्यास. |

असें साधारणपणें तीर्थरामांचें रोजचें वेळापत्रक असे. यावरून ते बी. ए. मध्यें गणित घेऊन सर्व पंजाबांत पहिले आले ते कशामुळें हें सहज कळून येईल. म्हणच आहे – '**चणे खावे लोखंडाचे तरिच ब्रह्म पदीं नाचे !**'

**शेवटचें** पण अत्यंत **महत्त्वाचें कारण** —

### कामगिरीची स्पष्ट कल्पना.

आपण जन्माला येऊन कोणंती कामगिरी करणार हें निश्चित ठरविलें असलें पाहिजे; नाहीं तर वरील सर्व गोष्टी असून फुकट जातील. '**जसें जमेल तसें जमेल**' असेंच म्हणणारे बहुतेक असतात, त्यामुळें उत्तम कार्य करणारे फारच थोडे निपजतात. **गुरुवर्य भांडारकर, आगरकर, टिळक** व **दादाभाई नौरोजी** यांनीं आयुष्याची कामगिरी विद्यार्थिदशेंतच कायम केली होती, म्हणूनच त्यांच्या हातून उज्ज्वल

देशसेवा घडली. अशा तऱ्हेचे चांगले गुण **तीर्थरामांत** होते म्हणूनच तो दारिद्र्य, बापाचा विरोध, शरीराची दुर्बलता, वगैरे अडचणींना न जुमानतां प्रत्येक परीक्षेंत उत्तम यश मिळवून बी. ए. मध्यें पहिला आला, इतकेंच नव्हे तर उत्तम तऱ्हेनें एकविसाव्या वर्षी एम्. ए. झाला. असो. अशा तऱ्हेनें येथें तीर्थरामांचा विद्यार्थी–आश्रम ऊर्फ ब्रह्मचर्याश्रम समाप्त झाला.

---

## ३ गृहस्थाश्रमाची पूर्वतयारी

**तीर्थरामानें विद्यार्थीआश्रम** किंवा **विद्यार्थिदशा** समाप्त केली आणि आतां त्याला **गृहस्थाश्रमांत** प्रवेश करावयाचा होता.

### ऋषिकालीन विद्याश्रम

पूर्वी ऋषिकालांत विद्यार्थीआश्रम अथवा विद्यार्थिदशा सुंदर, स्वच्छ, पवित्र, शांत व धर्मशील अशा ऋषींच्या आश्रमांत घालवावयास मिळत असे. यामुळें जगांतील धगधग व दगदग, काळज्या व कुविचार यांचा नुसता स्पर्शही विद्यार्थ्यांच्या मनांना होत नसे. गुरुजींच्या तपोवनांतील पर्णकुटिकेंत रात्रंदिवस राहावें, ते शिकवितील तें शिकावें, सांगतील तें काम करावें, कंदमुळें व फळें सेवन करावीं, खळखळ वाहाणाऱ्या पवित्र व निर्मळ नदीचें पाणी प्यावें व गुरुजींचें सद्वर्तन पाहून त्याप्रमाणें आपलें सद्वर्तन बनवावें आणि दोन तपें म्हणजे चोवीस वर्षे गुरुजींजवळ राहून **संपादन केलेली आनंदी** व **समाधानी मनोवृत्ति, तेजःपुंज शरीर, सुविद्या** आणि **सुस्वभाव** बरोबर घेऊन गुरुजींच्या परवानगीनें तपोवनांतून आपल्या वडिलांचे घरीं यावें व मनाला **अनुरूप धंदा** व **अनुरूप वधू** यांच्याशीं युक्त होऊन **गृहस्थाश्रमास** म्हणजे **संसारास** प्रारंभ करावा.

## हल्लींचा विद्याश्रम

काळ बदलला, त्याप्रमाणें हा क्रमही बदलला. आतां गलिच्छ शहरांत राहून काळजी व कलह यांनीं जर्जर झालेल्या जनांच्या गडबडींत कसाबसा अभ्यास करावा, शरीराची खराबी करील असें अन्न खावें, अनियमितपणानें राहून कशीबशी विद्या संपादन करावी.

## हल्लींचा विद्याश्रम

नंतर अस्थिपंजर बनून **हडकुळी बायको** व **रडकीं पोरें** यांना घेऊन पोटापुरतें मिळवून दहावीस वर्षे जगावें व **हालांत** शेवटीं एक दिवस **मरून जावें** अशी आजकाल **गृहस्थाश्रमाची** किंवा संसाराची **कहाणी** बनलेली आहे. असा फरक होण्याचीं कारणें —

१ **वाढतें दारिद्र्य.**
२ **बालपणीं लग्न.**
३ **धर्मशिक्षणाचा अभाव.**
४ **शारीरिक शिक्षण व तालीम यांना चाट.**
५ **चहा, चिरूट व चिवडा यांचें सेवन.**
६ **धंदेशिक्षणाचा अभाव.**
७ **पुस्तकी शिक्षणाचा सुळसुळाट.**
८ **परीक्षांचा राक्षसी जुलूम.**
९ **रिझल्टांत उडणारी कत्तल व**
१० **नोकरीचा अभाव.**

## संसाराला नालायक

असो. यांपैकीं दारिद्र्य व अगदीं बालपणीं झालेला विवाह या दोन कारणांमुळें विद्यार्थिदशेच्या शेवटीं बिचाऱ्या **तीर्थरामांचें शरीर सुदामदेवाप्रमाणें अस्थिपंजर** बनलें. तोंडाला चव नाहीं, खाल्लेलें पचायचें नाहीं, शौचाची तक्रार अशी बिचाऱ्या तीर्थरामांची वाईट स्थिति

झाली होती. त्याला वारंवार ताप येई व कपाळ भयंकर दुखे. त्याच्या अंगावरचें मांस नाहींसें होऊन सर्व हाडें दिसूं लागलीं व त्याचा आवाज खोल गेला होता. जरी आपण एम्. ए. होऊन मोठे पंडित झालों तरी अशा या दुबळ्या शरीराला घेऊन संसारांत पडणें बरोबर नाहीं असें वाटून तीर्थरामांनीं आतां आपल्या नेभळ्या दुबळ्या शरीराला तेजस्वी, पीळदार, कणखर व कंटक बनविण्याचें ठरविलें.

## हल्लींचे उपाय

दुबळें शरीर सशक्त बनवायचें असलें म्हणजे हल्लींचे तरुण मोठमोठीं किंमतवान इंग्रजी व देशी शक्तिवर्धक औषधें घेतात आणि **शरीर नुसतें दिखने मे ढब्बू व चलने मे शिवराई** बनवतात, तसा अविचार तीर्थरामानें केला नाहीं.

## तीर्थरामाचे उपाय

त्यानें पूर्ण विचार करून **देशी** आणि **विलायती तालमींचा** बारकाईनें लक्ष देऊन अभ्यास केला व प्रत्येक पद्धतींतलें चांगलें तेवढें घेऊन आपल्याला **हितकर** अशी एक **पद्धत बनवली** व त्या पद्धतीला नित्यनियमानें अनुसरून तो व्यायाम करूं लागला. शिवाय तो **सकाळ संध्याकाळ** फार दूरपर्यंत **फिरावयास जाई**. त्यानें अन्न सोडून दिलें व तो नुसत्या दुधावर राहूं लागला. तो वाढवीत वाढवीत रोज पांच शेर दूध पिऊं लागला व तें चांगलें पचवूं लागला. अशा तऱ्हेनें चिकाटीनें मेहनत करून त्यानें आपलें शरीर तेजःपुंज, कंटक व चपळ बनविलें. याशिवाय **योगासनें** व **प्राणायाम** यांचा अभ्यासही या कामीं त्याला फार उपयोगीं पडला. इतकी मेहनत घेऊन जेव्हां त्यानें शरीर समर्थ बनविलें तेव्हांच तो संसारांत पडला.

## ४ तीर्थरामांचा गृहस्थाश्रम

**तीर्थरामांचा** गृहस्थाश्रम असा काळजीपूर्वक सुरू झाला, यामुळें तो फार सुख आणि आनंद यांनीं युक्त असा झाला. चांगल्या गृहस्थाश्रमाचें 'सुभाषितकारां' नीं असें वर्णन केलें आहे—

**सानंदं सदनं सुताश्च सुधियः कान्ता न दुर्भाषिणी ।**
**सन्मित्रं सुधनं स्वयोषितिरतिः चाज्ञापराः सेवकाः ।**
**आतिथ्यं शिवपूजनं प्रतिदिनं मिष्टान्नपानं गृहे ।**
**साधोः संगमुपासते हि सततं धन्यो गृहस्थाश्रमः ॥**

वर वर्णन केल्याप्रमाणें तीर्थरामांचा गृहस्थाश्रम शिवपूजनानें, पाहुण्यांच्या आदरातिथ्यानें, मधुर भाषण करणाऱ्या पत्नीमुळें, मुलगे सुबुद्धीचे झाल्यामुळें आणि साधुजनांच्या संगतीनें खरोखरच नमुनेदार झाला.

### सुंदर जोडपें

तीर्थरामाची बायको त्याच्यापेक्षां थोड्याच वर्षांनीं लहान होती, यामुळें हें जोडपें फारच सुंदर दिसे. तीर्थराम गृहस्थाश्रमांत शिरला तेव्हां अतिशयच सुंदर दिसूं लागला. त्याचा तो आर्यवंशाला साजेसा सुंदर चेहरा, विनयशील व मोहक मुद्रा, विशाल कपाळ, पाणीदार आणि काळेभोर वाटोळे टपोरे डोळे, सुंदर वर्तुलाकार भुंवया, तरतरीत नाक, नाजूक, लाल व चिमुकले ओठ आणि गौरवर्ण, हीं आतां नवयौवनानें अतिशयच खुलून दिसूं लागलीं. अशी ही मोहक मूर्ति योगासन घालून आनंदसमाधींत निमग्न होऊन वसली म्हणजे त्याच्या बायकोचें हृदय प्रेमानें आणि आनंदानें भरून जाई व ती ध्यानस्थ झाल्याप्रमाणें त्याच्याकडे टक लावून तासचे तास बसत असे. तीर्थरामानें उपदेशानें व आपल्या सुसंगतीनें आपल्या पत्नीलाही आपल्याप्रमाणें उदार व प्रेमळ बनविलें. असो.

## तीर्थरामाचें विऱ्हाड

अनुरूप सुशील पत्नीला घेऊन **तीर्थरामानें विऱ्हाड** तर **मांडलें.** लगेच विऱ्हाडाचा खर्च कसा भागवावयाचा हा प्रश्न पुढें उभा राहिला. संसाराला लागणारा पैसा आपल्या आवडीच्या धंद्यापासून मिळवावा असें तीर्थरामाला साहजिकच वाटलें म्हणून त्यानें कॉलेजांतील विद्यार्थ्यांसाठीं गणिताचे वर्ग काढले. इतर कोणतेही विषय शिकविण्यापेक्षां गणित विषय शिकविणें फार कष्टाचें असतें. त्यांत शिकणाऱ्याप्रमाणें शिकविणाऱ्यालाही सपाटून मेहनत करावी लागते. त्यांत प्रत्येक काम अत्यंत कळकळीनें मेहनत घेऊन करण्याचा तीर्थरामाचा स्वभाव. या आपल्या स्वभावाप्रमाणें तीर्थरामानें गणित शिकवितांना जिवापाड मेहनत घेतली. पण त्यामुळें त्याची नुकतीच सुधारलेली प्रकृति पुनः बिघडली.

## जन्मभूमीस पुनरागमन

तो आजारी पडला व त्यामुळें वर्ग बंद करून त्याला आपल्या **जन्मभूमीस** म्हणजे **मुरलीवाला** गांवीं जावें लागलें. मुरलीवाला येथें कांहीं दिवस योग्य उपचार करून तीर्थरामाची प्रकृति सुधारली. आतां पुनः नोकरी शोधण्याच्या उद्योगास तो लागला व सुदैवानें **सियालकोट** येथील **मिशन हायस्कूलमध्यें** शिक्षकाची नोकरी त्याला मिळाली.

## नमुनेदार शाळामास्तर

या शाळेंत त्याला ऐंशीं रुपये पगार मिळत असे व गणित विषय शिकवावा लागे. गणित विषय त्याच्या आवडीचा होता, यामुळें त्याचें मन तेथें रमलें. त्याची शिकविण्याची पद्धत विद्यार्थ्यांना फार आवडली व ते त्याच्यावर खूप झाले. तोही विद्यार्थ्यांशीं समरस झाला. शाळेबाहेर तो विद्यार्थ्यांमध्यें मिसळे, त्यांच्याबरोबर फिरावयास जाई, त्यांना सनातनधर्माचा उपदेश करी व देवावर

भक्तियुक्त प्रेम करण्यापासून किती आनंद होतो हें समजावून सांगे. ह्या त्याच्या बेतास पोषक अशी एक गोष्ट झाली. त्याला शिक्षकाच्या कामाशिवाय आणखी त्या शाळेच्या बोर्डिंगचा सुपरिंटेंडेंट नेमिलें. यामुळें त्याच्या प्रेमळ संगतीचा विद्यार्थ्यांना दिवसाचे चोवीस तास लाभ मिळूं लागला. आपल्या मनाला आनंदविणारें काम सारा दिवस करावयास मिळाल्यामुळें त्याचेंही मन प्रफुल्लित झालें.

## शाळामास्तराचा प्रोफेसर

इतक्यांत त्याला लाहोर येथील फोरमन ख्रिश्चन कॉलेजमध्यें गणिताचा प्रोफेसर नेमिलें. यामुळें त्याला इ. स. १८९६ च्या अखेरीस **लाहोरास** जावें लागलें. यामुळें त्याच्या सियालकोटच्या शिष्यजनांस फार वाईट वाटलें. सियालकोटच्या सर्व लोकांनाही त्याच्या प्रेमळ, भक्तियुक्त धर्मप्रवचनांची गोडी लागली होती; यामुळें त्याच्या वियोगानें तेही दुःखित झाले. असो.

**लाहोर** येथें **फोरमन कॉलेजांतील** कामाशिवाय त्याला तेथील **ओरिएंटल कॉलेजांतही** प्राध्यापकाचें काम मिळालें. हे दोन हुद्दे एकाच वेळीं मिळाल्यामुळें तीर्थरामाची योग्यता वाढली, स्थिति सुधारली व लोक त्याला फार मान देऊं लागले.

## विद्या विनयेन शोभते

इतकें झालें तरी तीर्थरामाच्या पोषाखांत किंवा स्वभावांत किंचितही फरक झाला नाहीं. तो आपल्या पगारापैकीं अत्यंत काटकसरीनें कुटुंबाला लागतील इतकेच पैसे खर्च करी व बाकीचा पगार गरीब विद्यार्थ्यांना मदत करण्याच्या कामीं, आणि आंधळे, पांगळे व गरीब अशा लोकांना मदत करण्याच्या कामीं खर्च करी. आतां आपण बायकोला पुष्कळ दागिने केले असतील, नानातऱ्हेच्या सुंदर वस्तूंनीं आपलें घर शृंगारलें असेल, पैसाही बराच सांठविला असेल अशा तऱ्हेच्या आलेल्या पत्राला त्यांनीं उत्तर पाठविलें तें असें —

## खरा आनंद कशांत ?

" मिळविलेले पैसे बायको व घर शृंगारण्यांत खर्च करण्यापासून मला किंचितही सुख वाटत नाहीं. द्रव्यसंचयानें सुखप्राप्ति होते असें मला वाटत नाहीं. **परदुःख निवारण करणें व अनन्यभावानें कृष्णभक्तींत रंगून जाणें ह्यांतच खरा आनंद आहे** असें मी समजतों."

अशा तऱ्हेनें वागण्यानें त्यांना इतरांप्रमाणें बायकोकडून कधींही त्रास झाला नाहीं. तिनें दागिन्यांकरितां त्यांना कधींही सतावून सोडलें नाहीं. **त्यांना ज्यांत सुख त्यांतच आपल्याला सुख अशा मनाची ती थोर पतिव्रता होती.**

## कृष्णभक्तिविजय

लाहोरांतील त्यांचा काल त्यांना व लाहोरच्या लोकांना फार सुखाचा गेला. गणित विषय ते किती मनोरंजक करून शिकवीत असतील ह्याची साक्ष त्यांनीं त्या वेळीं लिहिलेला **गणितावरील निबंध** अजूनही देत आहे. गणिताप्रमाणें त्यांना **वेदान्तही** शिकवावा लागे. तोही विषय ते सोपा व मनोरंजक करून शिकवीत. यामुळें दोनही कॉलेजांत ते अत्यंत लोकप्रिय झाले. लाहोरवासी जनांना त्यांचीं वेदान्त, उपनिषदें व गीता यांचेवरील व्याख्यानें फारच आवडत. पूर्वीं ज्यांना कृष्णाचें वर्तन निंद्य असें वाटत असे त्याच लोकांना तीर्थरामांचीं प्रेमभरित कृष्णचरित्रावरील व्याख्यानें ऐकल्यावर कृष्णचरित्राचें रहस्य कळून कृष्णभक्तींत रमून जावें असें वाटूं लागे. केवढा हा तीर्थरामांच्या **वाणीचा प्रभाव !** असें वाक्सामर्थ्य फारच थोड्यांना लाभतें.

## लाहोरांत लोकमान्यता

एवढे जाडे पंडित इंग्रजी शिकून एम्. ए. झालेले तीर्थराम, पण त्यांच्या इंग्रजी ज्ञानानें त्यांच्या मनांतील कृष्णभक्तीचें उज्ज्वल प्रेम आटवून टाकलें नाहीं. लाहोरास असतांना एकान्तांत **कृष्णभक्तिप्रेमांत** रंगून

जावें म्हणून ते फार दूर फिरावयास जात. रात्री नदीच्या कांठीं **कृष्णप्रेमानें** ओथंबलेलीं गीतें गात तासचे तास फेऱ्या घालीत. त्या प्रेमांत दंग झाल्यामुळें सूर्य केव्हां मावळला व रात्र किती झाली याचें त्यांना भानही नसे. मग कसे तरी भानावर आल्यावर ते रात्रीं काळोखांतून घरीं येत. बरोबरीच्या प्रोफेसर मित्रांमध्यें वायफळ गप्पा-गोष्टी करीत ते बसत नसत.

## सुटीचा सदुपयोग

कॉलेजला सुटी झाली म्हणजे **कृष्णाच्या चरित्राशीं संलग्न झालेलीं मथुरा, वृंदावन** वगैरे **क्षेत्रें** पाहावयास ते जात व तेथें कृष्ण-भक्तांबरोबर कृष्णभक्तींत दंग होऊन सर्व सुटी घालवीत. सनातन-धर्मसभेपुढें **गीता** व **कृष्णभक्ति** या विषयांवर व्याख्यानें ते देत, तेव्हां त्यांच्या डोळ्यांतून प्रेमाच्या अश्रुधारा वहात असत व श्रोत्यांचीही तशीच स्थिति होत असे. याप्रमाणें तीर्थराम अत्यंत श्रेष्ठ व प्रेमळ भक्त बनले हें तुम्हाला दाखविलें.

## भक्ताचा देव कसा झाला ?

आतां यापुढें जाऊन ते **परमेश्वराशीं एकरूप** कसे झाले, ईश्वरापासून मी निराळा नाहीं असें त्यांच्या मनांत कोणीं बिंबविलें तें सांगतों. त्यांच्या कॉलेजला नुकतीच सुटी झाली होती, व ते सनातन धर्मसभेच्या चिटणिसाचें काम मनोभावानें करीत होते. इतक्यांत अतिशय श्रेष्ठ असे **द्वारकेचे शंकराचार्य** लाहोरास आले. धर्मसभेचे चिटणीस म्हणून तीर्थराम लगेच त्यांच्या सेवेला धावले. **शंकराचार्य लाहोरला** होते तेव्हां सदासर्वदा तीर्थराम यांनीं अतिशय उत्सुकतेनें श्रींचीं प्रवचनें मन लावून ऐकलीं, यामुळें आत्मज्ञानाचा पूर्ण प्रकाश त्यांच्या हृदयांत पडला. त्यांचेवर श्रींचें प्रेम बसलें व ते त्यांना काश्मीरांतही आपल्याबरोबर घेऊन गेले व जेव्हां कॉलेज उघडल्यामुळें तीर्थरामांना

परत जावें लागलें तेव्हां श्रींनीं त्यांना आशीर्वादपूर्वक आत्मज्ञानाचा अभ्यास नेहमीं चालू ठेव असा उपदेश केला. तीर्थरामानें या उपदेशाप्रमाणें वर्तन केलें. यामुळें त्यांना आत्मज्ञानापुढें सर्व फुकट असें वाटून प्रोफेसरची नोकरीही सोडून द्यावी असें वाटलें. पण ते विचारी होते. आपल्या बायकापोरांची पोटापाण्याची साधारण तरतूद करणें आपलें कर्तव्य आहे हें ते जाणत होते, यामुळें तशी तरतूद करीपर्यंत त्यांनीं नोकरी न सोडण्याचें ठरविलें असल्यास नवल नाहीं.

## एक पाऊल पुढें

श्रीशंकराचार्यांच्या उपदेशानंतर तीर्थरामाच्या मनांत बराच फरक पडला. पूर्वी श्रीकृष्णाचें भक्तिप्रेमाचें वेड त्याला लागलें होतें. भक्तिप्रेमानें **मथुरा** किंवा **वृंदावन** येथें इतर भक्तजनांबरोबर कृष्णाचीं भक्तिप्रेमानें भरलेलीं पदें गात नाचावें व भक्तिप्रेमांत रंगून जावें अशी त्याची मनोवृत्ति होती. आतां त्याचें एक पाऊल पुढें पडलें. आतां त्याला भक्तिप्रेमानें मथुरेला इतर भक्तांबरोबर भक्तीनें कृष्णगीतगान व नर्तन यांत दंग होण्यापेक्षां, **हरिद्वार, हृषीकेश** वगैरे हिमालयांतील निबिड अरण्यांतील निर्जन प्रदेशांत जाऊन रमणीय निसर्गरूपी परमेश्वराशीं तद्रूप होऊन जावें व आपलें मीपण विसरावें असें वाटूं लागलें.

## सुटींत समाधिसाधन

आतां तो मथुरेला न जातां निर्जन वनांत हिमालयांत जाऊन समाधि लावण्यास व ईश्वरस्वरूपांत विलीन होण्यास शिकूं लागला. कॉलेजला सुटी झाली, कीं तीर्थराम लगेच हरिद्वाराचा रस्ता धरी व तेथें आत्मसाक्षात्कार होण्यासाठीं ध्यानस्थ होऊन बसे. असे दोन वर्षें सतत प्रयत्न केल्यावर इ. स. १८९८ च्या सेप्टेंबर महिन्यांत त्यांना हृषीकेशाजवळ ब्रह्मपुरींतील तपोवनांत **आत्मसाक्षात्कार** झाला; म्हणजे **आपण व परमेश्वर एकरूप** झाल्याचा जो **ब्रह्मानंद** तो त्यांना प्राप्त झाला. त्या वेळीं **तीर्थराम** केवळ पंचवीस वर्षांचे होते.

## स्वर्गीय सौंदर्यप्रभाव

आत्मसाक्षात्कारामुळें त्यांच्या चेहऱ्यावर निराळेंच स्वर्गीय सौंदर्य चमकूं लागलें. त्यांच्या स्वर्गीय हास्यानें हजारों लोक त्यांचेकडे धाव घेऊं लागले. नंतर ते कॉलेजांतील कामावर रुजू झाले. कांहीं एक वासना न धरतां कर्म करीत कसें रहावें याचा नमुना दाखविण्यासाठीं ते तपोवनांतून लाहोरास आले होते, आणि आपल्या दर्शनानें, आपल्या भाषणांनीं व आपल्या नमुनेदार वर्तनानें जनमनांना सन्मार्गाला लावीत होते. इ. स. १८९९ सालीं उन्हाळ्याची सुटी होतांच ते अमरनाथच्या यात्रेला निघून गेले. ती कडक थंडीची यात्रा त्यांनीं एका वस्त्रानिशीं केली. नंतर ते भयंकर आजारी पडले व मरतां मरतां वांचले.

## तीर्थराम जीवन्मुक्त झाले

वर सांगितल्याप्रमाणें **आत्मसाक्षात्कार** झाल्यामुळें तीर्थराम आतां **जीवन्मुक्त** झाले म्हणजे जिवंतपणींच त्यांना मोक्ष प्राप्त झाला. यानंतर जरी लोकांना ते पूर्वींप्रमाणें सर्व कर्में करितांना दिसले तरी त्या कर्मांत आतां अहंभाव किंवा मी-तूंपणा राहिला नव्हता. म्हणजे इतर लोकांना जी स्थिति संसाराचा त्याग करून वनांत जाऊन तेथें बरेच दिवस सर्वसंगपरित्याग करून मिळावयाची ती त्यांना संसारांत असतांनाच प्राप्त झाली. अशी स्थिति प्राप्त झाल्यावर संसाराचा त्यांना कंटाळा आला. येथें त्यांचा गृहस्थाश्रम समाप्त झाला.

---

## ५ वानप्रस्थाश्रम

ज्याला परमेश्वराशीं एकरूप होण्याचें सुख प्राप्त झालें तो गृहस्थाश्रमांत व जगांत फार दिवस राहात नाहीं. त्याला वनवासांत सुख आहे असें वाटतें व तो वनांत आश्रम करून निवान्तपणें राहावयास जातो. तसेंच

आतां तीर्थरामानें केलें. त्याला नोकरी करण्याचा कंटाळा आला. त्यानें आपल्या प्रोफेसरच्या जागेचा राजीनामा दिला. तेव्हां त्याच्या प्रिय शिष्यांना फार दुःख झालें व ते सभोंवतीं गोळा होऊन प्रेमानें म्हणाले, 'राम, तुमच्या दर्शनाचा, दिव्य संभाषणाचा व स्वर्गीय संगतिसुखाचा लाभ इतके दिवस देऊन आतां आम्हाला सोडून तुम्ही वनांत जाणार मग आम्हाला तुमचें दर्शन कसें होणार?' असाच प्रश्न मित्रांनीं व नातेवाईकांनीं विचारला, त्या सर्वांना रामानें एकच उत्तर दिलें. तो म्हणाला, 'तुमचा तीर्थराम आतां रामस्वरूपांत मिळून गेला. आतां तो आणि प्रभु राम यांत भेद उरला नाहीं. आतां तो तुमच्या हृदयांत असलेल्या आत्मारामाशीं एकवटून गेला. आंत नजर फिरवा व तुमच्या आत्मारामाला पाहावयास शिका. आत्मारामाला पाहावयास शिकलेत, आत्माराम दिसायला लागला म्हणजे तोच तुमचा तीर्थराम. आतां तीर्थरामाची व तुमची सर्वांची भेट तुमच्या अंतःकरणांतच होणार.' असो.

## तीर्थरामाचें वनाभिगमन

प्रिय **तीर्थराम** सर्वांना सोडून सहकुटुंब वनाला जाणार ही वार्ता हां हां म्हणतां सर्व **लाहोर** शहरभर पसरली. नगरवासी नरनारींच्या झुंडीच्या झुंडी त्याचें—त्या दाशरथी रामतुल्य तीर्थरामाचें—अखेरचें पुण्यदर्शन घेण्यासाठीं सर्व कामधंदा सोडून त्याचे घराकडे जाऊं लागल्या. त्याच्या घराभोंवतीं प्रेमी नरनारींचा गराडा पडला. अंगावर फक्त एक वस्त्र परिधान करून तीर्थराम अनवाणीच घरांतून बाहेर पडले. त्यांचे मागून लहुकुशांप्रमाणें शोभणारे त्यांचे बालकुमार **मनमोहन** व **ब्रह्मानंद** आणि त्यांची **एकुलती** एक **कन्या** चालूं लागली. त्यांचे मागून त्यांचे सत्‌शिष्य **नारायणस्वामी** चालूं लागले. हें दृश्य पाहून जमलेल्या नागरिकांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या.

वाटेंत ठिकठिकाणीं लोकांनीं **तीर्थरामांना** पुष्पहारांनीं मंडित केलें व त्यांचें चरणाभिवंदन केलें. हजारों लोक देहभान विसरून **तीर्थरामांच्या** मागोमाग जाऊं लागले. तो सर्वच सोहळा हृदयाला हलवून सोडणारा होता. भक्तमंडळी वैराग्यकवनें गात व भजन करीत **तीर्थरामांच्या** मागून चालली होती. ठिकठिकाणी **तीर्थरामांवर** पुष्पांचा वर्षाव होत होता.

अशी ही मिरवणूक लाहोर शहराची सीमा उल्लंघून बाहेर आली. तेथें **तीर्थराम** व त्यांचें कुटुंब यांसाठीं एक गाडी तयार होती. त्या ठिकाणीं भक्तजनांनीं अर्धा तास भजन केलें. तीर्थरामांनीं लोकांना वंदन करून व उपदेश करून परत जाण्यास विनविलें. मग नाइलाज होऊन विरह-कल्पनेनें अश्रुपूर्ण नयनांनीं लोकांनीं तीर्थरामांचा निरोप घेतला व ते परत फिरले. तरी बरेच लोक परत जात ना; ते थेट हरिद्वारपर्यंत तीर्थरामांबरोबर गेले.

## वनवासास प्रारंभ

नंतर सर्व मंडळी हिमालयांत **टिहरीला** गेली. तेथून एक कोसावर गंगा नदीच्या कांठीं **शेट मुरलीधर** यांच्या सुंदर बगीच्यांत **तीर्थरामांनीं** आपल्या वनवासास सुरुवात केली. बाळांनो, आपला तीर्थराम आतांपर्यंत दोन आश्रम आक्रमून **तिसरा आश्रम** जो **वानप्रस्थ** त्या आश्रमांत दाखल झाला. आयुष्याचे धर्मशास्त्रानें चार भाग पाडून दिलेले आहेत व त्यांपैकीं प्रत्येक भागांत कसें वागावें तें सांगितलें आहे. त्या धर्मशास्त्राच्या नियमांप्रमाणें जो चालतो त्याचें आयुष्य सुखमय होतें. आयुष्याच्या चार भागांचीं नांवें —

**ब्रह्मचारी गृहस्थश्च वानप्रस्थो यतिस्तथा ।**
**एते गृहस्थप्रभवाश्चत्वारः पृथगाश्रमाः ।।**

म्हणजे **ब्रह्मचारी**, **गृहस्थ**, **वानप्रस्थ** व **संन्यासी** हे आयुष्याचे चार भाग म्हणजे चार **आश्रम** आहेत. आतां या चार आश्रमांचा काल

सांगतों — **मुंज** झाल्यापासून मुलाचा **ब्रह्मचर्याश्रम** सुरू होतो. या आश्रमांत त्यानें आपली विद्या पूर्ण होईपर्यंत राहावयाचें असतें. या आश्रमांत साधारणपणें तो **सहाव्या** वर्षापासून **वीस एकविसाव्या** वर्षापर्यंत असतो. एकविसाव्या वर्षीं विद्या संपादन करून गुरुजींच्या परवानगीनें तो लग्न करतो व आपला **उपजीविकेचा** धंदा सुरू करून आपल्या **गृहस्थाश्रमास** सुरवात करतो. या आश्रमांत त्यानें येथपर्यंत राहावें —

**गृहस्थस्तु यदा पश्येत् वलीपलितमात्मनः ।**
**अपत्यस्य तथापत्यं तदारण्यं समाश्रयेत् ॥**

**अर्थ** — अंगावर सुरकुत्या दिसूं लागल्या, केस पांढरे होऊं लागले, नातवंड झालें म्हणजे मनुष्यानें आपला **गृहस्थाश्रम** संपवून **वानप्रस्थाश्रमांत** प्रवेश करावा, म्हणजे घर कर्त्या पुत्राचे स्वाधीन करून भार्येला घेऊन अरण्यांत जावें व तेथें आश्रम बांधून राहावें. तेथें त्यानें द्रव्याचा संग्रह करूं नये. रोजच्या रोज वनांत जाऊन कंद, मुळें व फळें आणावीं व तीं खावीं व स्वच्छ झुळझुळ वहाणाऱ्या झऱ्याचें पाणी प्यावें. त्यानें कोणापाशीं कांहीं मागूं नये; जें सहजासहजीं मिळेल त्यावर उपजीविका करावी. कशावरही वासना ठेवूं नये. सर्व ठिकाणचें **लक्ष** काढून घेऊन तें **परमेश्वरावर** लावावें व अशा तऱ्हेनें **सर्वसंगपरित्याग** म्हणजे पुढील जो **संन्यासआश्रम** त्याची पूर्वतयारी करावी. या आश्रमांत अशी पूर्वतयारी झाल्यावर —

**वनेषु तु विहृत्यैवं तृतीयं भागमायुषः ।**
**चतुर्थं आयुषो भागं त्यक्त्वा संगान् परिव्रजेत् ॥**

**अर्थ** — आयुष्याचा तिसरा भाग वनांत काढून व सर्व वस्तूंवरील आसक्ति सोडून चौथ्या भागांत संन्यासी होऊन फिरत राहावें.

आपल्या धर्मानें आयुष्याची कशी सुरेख व्यवस्था करून दिलेली आहे ती पाहा. पण लहानपणींच लग्न करून आपले

वडील आपल्या **ब्रह्मचर्याश्रमाची** व **गृहस्थाश्रमाची** भेसळ करून देतात, यामुळें फार तोटा होतो. तीर्थरामाच्या वडिलांनींही अविचारानें तीर्थरामांचें लहानपणीं लग्न करून त्यांच्या **ब्रह्मचर्याश्रमाची** व **गृहस्थाश्रमाची** भेसळ करण्याचा पाया घातला होता. परंतु तीर्थराम शहाणे होते. लग्न झालें होतें तरी विद्या पुरी होईपर्यंत ते ब्रह्मचारी राहिले व विद्या पुरी झाल्यावर **ब्रह्मचर्याश्रम** पुरा करून धर्मपत्नीसह आनंदानें त्यांनीं **गृहस्थाश्रमांत** प्रवेश केला. एखाद्या हुषार मुलानें ज्याप्रमाणें पांचव्या यत्तेंतून एकदम सातव्या यत्तेंत उडी मारावी त्याप्रमाणें तीर्थरामानें धर्माच्या अत्यंत कळकळीच्या अभ्यासानें सर्व वस्तूंवरची **आसक्ति सोडून** व परमेश्वराशीं **एकरूपता जोडून** एकदम **संन्यासाश्रमांत** प्रवेश करण्याची योग्यता अंगांत आणली.

तरी पण आपल्या पत्नीला एकदम एवढी उडी मारवणार नाहीं हें त्यांना ठाऊक होतें. गृहस्थाश्रमांतून वानप्रस्थाश्रमांत आपल्या पत्नीसहच प्रवेश करण्याचें त्यांनीं ठरविलें. यांत त्यांचा हेतु असा होता कीं वनवासांत पत्नीच्या सर्व इच्छांचा व आसक्तीचा आपोआपच विलय होईल व तिला वैराग्य प्राप्त होईल; म्हणजे दोघांची संन्यास-आश्रमांत शिरण्याची तयारी होईल. वनवासांत राहात असतां तीर्थरामाच्या मंडळींचे फार हाल झाले. या आश्रमाप्रमाणें कोणत्याही वस्तूचा संग्रह करूं नका, परमेश्वरावर पूर्ण विश्वास ठेवा व त्याच्या चिंतनांत निमग्न असा, अशी आज्ञा त्यानें आपल्या बरोबरच्या मंडळीला केली व कंदमुळांवर उपजीविका करून राहा असें सांगितलें.

या गोष्टींना तीर्थरामाची तयारी होती, पण त्याच्या मंडळीची तयारी नव्हती. तरी पण तीर्थरामाच्या आज्ञेप्रमाणें पोटाला चिमटा देऊन सर्व मंडळी राहिली व पोटाचा भार त्यांनीं परमेश्वरावर टाकला. अशा तऱ्हेनें ईश्वरावर पूर्ण विश्वास ठेवून ती सर्व मंडळी ईशचिंतनांत ध्यानस्थ बसलेली पाहून देवाला त्यांच्या खाण्यापिण्याची

व्यवस्था करणें भाग पडलें. तें ईश्वरानें हिमालयाच्या त्या अगदीं निर्जन व दाट जंगल्यांत देखील कसें जुळवून आणलें तें पाहा.

हिमालयांतील क्षेत्रांची व्यवस्था पाहात सहज **कलकत्त्याचे** स्वामी **रामनाथ** तेथें आले. त्यांनीं या सर्व मंडळींना ध्यानस्थ पाहिलें व आदरपूर्वक तेथील वाण्याला दरमहा दहा रुपयांचें धान्य माझ्या वतीनें या मंडळींना दे असा हुकूम केला. पाहा, देवानें त्या भयंकर जंगलांतही त्यांच्या पोटापाण्याची कशी तजवीज केली! या चमत्कारानें तीर्थरामानें पूर्वी केलेल्या उपदेशावर त्यांचा भरंवसा बसला व ते अधिक मन लावून ईश्वराचें चिंतन करूं लागले. हा धडा ते गिरवीत होते, तेव्हां तीर्थराम पुष्कळच पुढचा धडा गिरवीत होता.

अशा तऱ्हेनें सर्व सुरळीत चाललें होतें. इतक्यांत एक दिवस मध्यरात्रीं त्यांची सर्व मंडळी झोपेंत गर्क झाली असतांना तीर्थराम एकदम उठले व ईशचिंतनाच्या भरांत देहभान विसरून वाऱ्यासारखे वाट फुटेल तिकडे उंच उंच सुळकेदार तुटलेल्या कड्यांवरून पळत चढत चालले व शेवटीं एका शिळेवर ध्यानस्थ होऊन जे बसले ते कित्येक दिवस शुद्धीवर आलेच नाहींत. सकाळीं तीर्थराम कोठें दिसेनात, यामुळें त्यांच्या पत्नीच्या कोमल हृदयाला जोराचा धक्का बसला व ती जी अंथरुणावर पडली ती कायमचीच. आपल्या बायकोला हा वनवास सोसत नाहीं असें पाहून तीर्थरामांनीं तीन मुलांसह तिला घरीं पाठवून दिलें. तशाच आजारी स्थितींत कांहीं वर्षे काढून ती सन १९०७ मध्यें मरण पावली. नंतर **तीर्थराम** तेथें कित्येक महिने ब्रह्मानंद अनुभवीत राहिले.

---

## ६ संन्यास

बालमित्रांनो, या प्रकरणाच्या डोक्यावर संन्यास असा मथळा पाहून, एकदम लङ्ठनिरंजन, भगवी कफनी घालून व डोकें तासून पायांतील खडावा चटचट वाजवीत व हातांतील दंड झळकवीत बेदरकार फिरणाऱ्या बोकेसंन्याश्याची मूर्ति तुमच्या डोळ्यांसमोर उभी राहील. परम मंगल, परम पवित्र, परम पूज्य अशा **तीर्थरामांच्या** येथवर सांगितलेल्या सुंदर चरित्रांत बोकेसंन्यासी कशाला आणलात असें तुम्ही विचाराल, पण बाळांनो, जरा दमानें घ्या. बोकेसंन्यासी हा खरा संन्यासीच नाहीं, तर संन्यासाश्रमाला कलंक लावणारा नीच पुरुप आहे. असो.

बाळांनो, गेल्या प्रकरणांत वानप्रस्थाश्रमाची माहिती देत असतां खऱ्या संन्यासाश्रमाचीही थोडीशी माहिती तुम्हांला दिली. खरा संन्यास वंदनीय व उपकारक आहे व असा तो आहे म्हणूनच **तीर्थरामानें** वानप्रस्थाश्रमांत अतिशय कष्ट करून सर्व कर्मांवरची आसक्ति नाहींशी करून, ब्रह्मानंदांत व ईश्वरस्वरूपांत विलीन होण्याचा अभ्यास करून संन्यासाश्रमांत शिरण्याची योग्यता आंगीं आणिली.

आतां खरा संन्यास म्हणजे काय हें सांगतों. हाच प्रश्न अर्जुनानें गीतेच्या अठराव्या अध्यायाच्या आरंभीं भगवान श्रीकृष्णांना विचारला व त्याचें आपल्या अधिकारी वाणीनें भगवंतांनीं सबंध अठरावा अध्याय सांगून सविस्तर निरूपण केलें. जगाला वंदनीय अशा गीतेचा अठरावा अध्याय मुकुटमणी आहे. बाळांनो, तुमच्याजवळ सार्थगीता असेलच, ती उघडा व तिचा अठरावा अध्याय मन लावून वाचा म्हणजे संन्यासाश्रमाची तुम्हाला पूर्ण कल्पना येईल.

या अध्यायाचा पहिला श्लोक असा आहे —

अर्जुन उवाच —

**संन्यासस्य महाबाहो तत्त्वमिच्छामि वेदितुम्।**
**त्यागस्य च हृषीकेश पृथक्केशिनिषूदन॥**

**अर्थ** — अर्जुन म्हणाला, 'हे महाबाहो हृषीकेशा! हे केशिदैत्यांतका, **संन्यास** आणि **त्याग** यांचें तत्त्व म्हणजे यांचा खरा अर्थ मला समजावा अशी माझी इच्छा आहे.' यावर **श्रीकृष्ण** म्हणाले —

**काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः ।**
**सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणाः ॥**

**अर्थ** — कांहीं विद्वान मनांत फलाशा धरून केलेल्या कर्मांना सोडून देणें म्हणजे **संन्यास** असें म्हणतात पण खरे विचक्षण लोक सर्व कर्मांच्या नुसत्या फलाचा त्याग यालाच खरा त्याग म्हणतात. इतकें सांगून भगवान् श्रीकृष्ण आपलें निश्चित व उत्तम मत असें देतात —

**एतान्यपि तु कर्माणि संगं त्यक्त्वा फलानि च ।**
**कर्तव्यानीति मे पार्थ निश्चितं मतमुत्तमम् ॥**

**अर्थ** — हीं कर्मेंसुद्धां आसक्ति व फलाशा सोडूनच केलीं पाहिजेत, असें अर्जुना, माझें निश्चित व उत्तम मत आहे.

ह्या सर्वांचा अर्थ हा कीं संन्यास म्हणजे आळसानें सर्व कामें सोडून रिकामटेकडेपणानें हिंडणें नव्हे, **संन्यास** म्हणजे नेहमींप्रमाणें सर्व कर्में करीत राहाणें, पण त्या कर्मांच्या बऱ्या वाईट **फलाची आशा** व **आसक्ति टाकून देणें.** पूर्वीं जीं कर्में आपला स्वार्थ साधावा म्हणून आपण केलीं तीं आतां **निर्लोभपणें** व **निःस्वार्थीपणें** करणें याचें नांव संन्यास. **असा संन्यास अर्थात् उत्तम.**

अशा तऱ्हेचा म्हणजे **परमेश्वराशीं एकरूप** होऊन, स्वतःला विसरून निष्काम बुद्धीनें कर्में करण्याचा संन्यास **तीर्थरामानें** फार वर्षांपासून आचरला होता. आतां या **संन्यासाश्रमाचीं बाहेरचीं चिन्हें** म्हणजे शेंडी, जानवें व स्वतःचें नांव व साधीं वस्त्रें यांचा त्याग करून **नवीन नांव, भगवीं वस्त्रें, दंड कमंडलू** हीं धारण करणें राहिलें होतें. हीं धारण करण्याचा विधि **तीर्थरामानें** इ. स. १९०१ च्या आरंभीं **गंगा नदीचे** तीरावर केला.

संन्यासी झाल्यावर त्यांनीं **तीर्थराम** हें नांव टाकून **स्वामी रामतीर्थ** हें नांव धारण केलें. म्हणून यापुढें आपणही **तीर्थरामांना, स्वामी रामतीर्थ** असें म्हणूं. यानंतर **स्वामी रामतीर्थ** यांनीं सहा महिने एकान्तवास केला. नंतर सुमारें सहा महिने हिंडून हिमालयांतील क्षेत्रांची तीर्थयात्रा केली. नंतर ते **अलमोरा** येथें जाऊन रामकृष्ण कार्यालयाला भेट देऊन श्रीकृष्णांच्या **मथुरानगरीस** आले.

तेथें त्या वेळीं एक धर्ममहोत्सव व्हावयाचा होता. तो उत्सव **भारतधर्ममहामंडळाच्या** आश्रयाखालीं व्हावयाचा होता. त्या उत्सवाचें अध्यक्षस्थान **स्वामी रामतीर्थ** यांना देण्यांत आलें. तेव्हां अध्यक्ष-स्थानावरून त्यांनीं फार सुंदर व बोधपर व्याख्यान दिलें. तें हजारों प्रेक्षक चित्राप्रमाणें तटस्थ होऊन ऐकत होते. यानंतर स्वामींनीं सनातन धर्माचें खरें व उज्ज्वल स्वरूप लोकांना समजावून सांगण्याकरितां उत्तर हिंदुस्थानांत अनेक ठिकाणीं व्याख्यानें दिलीं. तीं लोकांना फार आवडलीं.

नंतर ते **आत्मचिंतनासाठीं** टिहरीजवळील जंगलांत गेले. तेथें टिहरीच्या महाराजांना स्वामींचें पुण्यदर्शन झालें. टिहरीचे महाराजांचा देवावर विश्वास नव्हता, पण **स्वामींच्या दर्शनाच्या पुण्यप्रभावानें** त्यांच्या वृत्तींत फरक पडला. ते धार्मिक बनले. स्वामींविषयीं त्यांना फार आदर वाटूं लागला.

त्याच सुमाराला महाराजांनीं वर्तमानपत्रांत वाचलें होतें कीं जपानांत टोकिओ राजधानींत जगांतील **सर्व धर्मांची महापरिषद** भरविण्यांत येणार आहे. महाराजांना पैशाची अनुकूलता होती आणि सनातन धर्माविषयीं आदर आणि आस्था नुकतीच त्यांच्या हृदयांत जन्माला आली होती. तेव्हां सहज त्यांच्या मनांत आलें, कीं अशा **महाधर्म-परिषदेंत आर्यधर्माचें** उज्ज्वल स्वरूप उत्तम तऱ्हेनें मांडणारा **स्वामी रामतीर्थांसारखा** पुण्यशील व प्रभावशाली प्रतिनिधि पाठवला तर

22032

मोठेंच कार्य होईल. असें मनांत येतांच त्याविषयीं त्यांनीं स्वामींजवळ गोष्ट काढली. स्वामींनीं त्यांच्या विनंतीस मान देऊन जपानांतील या धर्मपरिषदेस जाण्याचें कबूल केलें. लगेच महाराजांनीं स्वामींच्या प्रवासाची सर्व तयारी थॉमस कुक कंपनीमार्फत करविली.

---

## ७ परद्वीपगमन व पृथ्वीप्रदक्षिणा

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें **स्वामी रामतीर्थ** आपले **शिष्य नारायणस्वामी** यांना बरोबर घेऊन कलकत्याहून आगबोटीनें जपानांत जावयास निघाले. वाटेंत निरनिराळीं चिनी व जपानी बंदरें लागलीं. त्या ठिकाणीं व्यापारासाठीं आपल्या हिंदुस्थानचे व्यापारी राहिलेले आहेत. त्यांनीं **स्वामी रामतीर्थांचा** आदरसत्कार केला. स्वामींनींही त्यांना आपल्या प्रेमळ व्याख्यानद्वारा सद्धर्मामृत पाजलें. सर्व ठिकाणच्या त्यांच्या व्याख्यानांचा श्रोत्यांच्या मनावर चांगला परिणाम होत असे.

दोन महिने जलप्रवास करून **स्वामी रामतीर्थ** सन १९०२ च्या नोव्हेंबर महिन्यांत **टोकिओ** येथें गेले. तेव्हां चौकशी केल्यावर त्यांना कळलें कीं 'धर्मपरिषद' होणार म्हणून जी बातमी प्रसिद्ध झाली होती ती सपशेल खोटी. असें समजल्यावर जपानांत फार दिवस राहाण्याचें कारणच उरलें नाहीं. तरी देखील थोड्याच दिवसांत बरेच शहरीं हिंडून स्वामींनीं **बंधुता, प्रेम** व सर्व **धर्मांचें ऐक्य** स्पष्ट करून सांगण्यासाठीं वक्तृत्वपूर्ण व्याख्यानें दिलीं, त्याचा जपानी लोकांवर चांगला परिणाम झाला. विशेषत: 'Secret of Success' म्हणजे 'यशाचें रहस्य' या विषयावर स्वामींनीं टोकिओ येथील प्रोफेसर व विद्यार्थी यांचेसमोर जें व्याख्यान दिलें तें फारच लोकप्रिय झालें.

दिल्ली येथील लाला अमीरचंद या थोर गृहस्थांनीं स्वामींचें समग्र वाङ्मय चार भागांत प्रसिद्ध केलें आहे, त्यांत तें व्याख्यान छापलेलें आहे, तें प्रत्येक विद्यार्थ्यानें अवश्य वाचावें. जपानांत निरनिराळ्या कला व शास्त्रें यांचा अभ्यास करण्यासाठीं पुष्कळ हिंदी विद्यार्थी गेले होते. त्यांनीं **स्वामी रामतीर्थांचें** अंत:करणपूर्वक स्वागत केलें. त्या विद्यार्थ्यांत **पूरणसिंग** नांवाचा एक शीख विद्यार्थी होता. तो स्वामींचा शिष्य व मित्र झाला आणि स्वामींच्या उपदेशानें प्रेरित होऊन त्यानें जपानांत अनेक शहरीं धर्मपर व्याख्यानें दिलीं. जपानांतील थोर लोकांवर **स्वामी रामतीर्थांची** चांगली छाप बसली.

जपानांत त्याच वेळेस महाराष्ट्रांतील प्रसिद्ध सर्कसवाले **प्रोफेसर विष्णुपंत छत्रे** यांची व **स्वामी रामतीर्थांची** गांठ पडली. स्वामींच्या तेजस्वी, प्रेमळ व बुद्धिमान चेहऱ्याकडे पाहतांच प्रो. छत्र्यांचा त्यांचेविषयीं चांगला ग्रह झाला. स्वामींचीं व्याख्यानें ऐकल्यावर तर प्रो. छत्र्यांना स्वामींविषयीं विशेष आदर वाटायला लागला. तेथें कांहीं दिवस सहवास घडल्यावर, आपल्या सुप्रसिद्ध सर्कसला घेऊन छत्र्यांना अमेरिकेंत ठिकठिकाणीं खेळ करावयास जावयाचें होतें, तेव्हां प्रो. छत्रे यांनीं स्वामी रामतीर्थांना आपले बरोबर अमेरिकेंत प्रवासास चलण्याची विनंति केली. ही विनंति स्वामी रामतीर्थांनीं आनंदानें मान्य केली व ते प्रो. छत्रे यांच्या सर्कसबरोबर अमेरिकेंत गेले.

## अमेरिकेंतील प्रवास

**स्वामी रामतीर्थ** अमेरिकेंत कां गेले किंवा हिंदुस्थानांतून जपानांत जातांना पुढें अमेरिकेंत जाण्याचा त्यांचा विचार होता काय, असा प्रश्न केला असतां काय उत्तर निघेल ? हेंच उत्तर येतें कीं त्यांचा तसा बेत नव्हता. इतकेंच नव्हे तर स्वामींनीं प्रोफेसरीची नोकरी सोडून व नंतर संसाराचा त्याग करून संन्यास घेतला तेव्हांपासून ते परमेश्वराशीं

इतके एकरूप झाले, कीं त्यांचे त्यापुढें स्वतःचे असे बेत राहिलेच नाहींत. परमेश्वरी योजनेप्रमाणें व परमेश्वराच्या प्रेरणेनें त्यांचे सर्व व्यवहार व कर्मे होऊं लागलीं.

लांब कशाला? **स्वामी** टिहरीला **एकांतवासास** गेले. पण परमेश्वराला वाटलें कीं त्यांना **धर्मज्ञानप्रसारासाठीं** हिंदुस्थानाबाहेर पाठवावें म्हणून अचानक **टिहरीच्या** महाराजांची भेट करवून त्यांचे मार्फत त्यांची जपानास रवानगी झाली. तसेंच पुढें झालें. सहजासहजीं **प्रो. छत्रे** यांची व त्यांची देवानें गांठ पाडली व त्यांचेमार्फत त्यांना **अमेरिका खंडांत** दौरा करावयास संधि दिली. या सर्व गोष्टींत **परमेश्वरी योजनेशिवाय** दुसरें काय आहे? **परमेश्वराला** त्यांचेकडून जशी जशी **धर्मसेवा** करून घ्यावयाची होती तशी त्यानें योजना जुळवून आणली.

**जपान व अमेरिकेच्या गरजा**—आतां यापुढील दुसरा प्रश्न असा कीं परमेश्वरानें तरी त्यांच्या या प्रवासाची योजना कां जुळवून आणली?

**उत्तर**—जपानांत मूळचा जरी बौद्धधर्म होता आणि बौद्ध धर्मानें जरी शेंकडों वर्षे जपानला शांतिसुख मिळवून दिलें तरी तो मनु आतां पालटला होता. जपानवर युरोपिअन राष्ट्रांनीं हल्ले केले व त्याला दे माय धरणी ठाय करून सोडलें. **जपानी चलाख डोक्यानें** ओळखलें कीं पश्चिमेकडील यांत्रिक सुधारणेनें व शिक्षणसुधारणेनें ते देश बलाढ्य झाले आहेत. लगेच त्यांची सुधारणा घेऊन जपानही **संपत्तीनें, सैन्यानें** व **आरमारानें** युरोपिअन देशांना भारी झाला.

पण चांगल्याबरोबर एक वाईट गोष्ट जपानांत आली. पश्चिमेकडचीं धन म्हणजे देव, आपलपोटेपणा म्हणजे उत्तम गुण, धडपड म्हणजेच सुख, धर्म म्हणजे खुळेपणा, श्रीमंत आणि सबळ यांनींच जगावें, भिकारी व दुबळे यांनीं नाहींसें व्हावें असलीं तत्त्वें तेथें बोकाळलीं. त्या तत्त्वांचा खोटेपणा देवाच्या मनांत **स्वामी रामतीर्थांकडून** जपान्यांच्या

नजरेस आणावयाचा होता. तुमच्या **राष्ट्रधर्मांत** म्हणजे **बौद्धधर्मांत** सांगितल्याप्रमाणें **प्रेम, क्षमा** व **शांति** यांच्या प्रस्थापनेंतच मानव जातीचें **सुख** व **समृद्धि** आहे हें जपान्यांना स्वामींकडून शिकवावयाचें होतें, म्हणून **देवानें** त्यांना जपानांत पाठवलें.

अशाच तऱ्हेच्या उपदेशाची अमेरिकेला फार जरूर होती हें परमेश्वराला पक्कें ठाऊक होतें, म्हणूनच त्यानें स्वामींना अमेरिकेंत नेलें व तेथें त्यांना चांगलीं दोन अडीच वर्षें राहाविलें. अमेरिकन लोकांना स्वामी रामतीर्थांच्या उपदेशाची अनावर भूक लागली होती, हा परमेश्वराचा अंदाज खरा ठरला. त्यांची भूक शमविण्याकरितां स्वामींना एकेका दिवशीं सहा सहा व्याख्यानें द्यावीं लागलीं. त्यांना व्यावहारिक वेदान्त शिकविण्याकरितां वेदान्ताचे वर्ग काढावे लागले, तरी देखील अमेरिकनांची भूक पुरतेपणीं शमली नाहींच. स्वामी **रामतीर्थांच्या** नांवाच्या संस्था त्यांनीं स्थापिल्या, त्यांच्या तसबिरी रोज दर्शन व्हावें म्हणून घरांत लाविल्या, त्यांनीं त्यांना आपल्या हृदयांत कायमचें स्थान दिलें.

शेवटीं जेव्हां ते हिंदुस्थानास जावयास निघाले तेव्हां त्यांना निरोप देतांना वियोगाच्या कल्पनेनें त्यांचे डोळे पाण्यानें भरून आले. खुद्द अमेरिकेचे प्रेसिडेंटही त्यांना मुद्दाम दोनदां भेटावयास गेले होते. स्वामींच्या दिव्य विचारांनीं जेवढी छाप अमेरिकनांच्या मनावर बसली तेवढी किंवा त्याहूनही अधिक छाप स्वामींच्या राहाणीनें बसली, यांत संशय नाहीं.

**स्वामींची अमेरिकेंतील राहाणी**—स्वामी अतिशय आग्रह झाला असतांही कोणा श्रीमंताच्या विलासी वाड्यांत कधींही राहिले नाहींत. ते वनलतांनीं भूषित केलेल्या व साक्रमेंटो नदीनें खळखळ वाहात जाऊन पवित्र बनविलेल्या एका टेकडीच्या माथ्यावर आश्रम करून राहिले. अमेरिकेंत स्वतः मिळवून आणलेल्या कंद मूळ फळांवर ते उपजीविका

करीत. खळखळ वाहाणाऱ्या साक्रेमँटो नदीच्या पात्रांतील शिळेवर आसन घालून ईशचिंतनांत मग्न होऊन उघड्यावर जंगलांत हिंस्र पशूंच्या संगतींत निर्भयपणें कित्येक दिवसपर्यंत समाधि लावून बसत. आपल्या आश्रमांत फक्त भूक भागवण्यासाठीं येत.

लोकांना ते नेहमीं आनंदाची मूर्ति दिसत. नुसत्या त्यांच्या दर्शनानें विचारावयाचे नास्तिक प्रश्न मनांतून पार पसार होत व त्यांची जागा ईश्वरश्रद्धा व प्रेम भरून काढीत. त्यांच्याविषयीं अमेरिकनांना काय वाटत होतें याची कल्पना त्यांच्या जलसमाधीची बातमी ऐकून एका अमेरिकनानें लिहिलेल्या एका पत्रांतील खालील मजकुरावरून करतां येईल.

तो म्हणतो, "रामाचें भाषण लहान बालकाप्रमाणें अव्याज मनोहर होतें. तो सृष्टिसुंदरीचें अत्यंत प्रिय आणि मनोहर बालक होता. विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें राम थोडक्याच पण गोड, प्रेमळ व असंदिग्ध शब्दांनीं देत असे. प्रत्येक मनुष्यांत त्याला परमेश्वर दिसत असे. राम एका टेकडीवर तंबूत राही. तें स्थळ फार रम्य होतें. तेथें सृष्टिसुंदरीचें रमणीय रूप पाहावयास सांपडे. तेथून खडकांतून मोठ्या खळखळाटानें साक्रेमँटो नदी जोरानें वाहात होती. या ठिकाणीं **रामाचें** लेखन, वाचन व मनन तासचे तास चालत असे.

नदीचे पात्रांतील शिळेवर कित्येक दिवस, कधीं कधीं तर कित्येक आठवडे **राम** समाधि लावून बसे व जेवावयास मात्र घरीं येई. त्या वेळीं भेटणाऱ्या आम्हांस तो किती गोड विचारांची मेजवानी देई! तो दूरवर फिरावयास जाई. तो सतत कामांत निमग्न असे. त्याची **राहाणी साधी, सुखमय** व **प्रांजळ** असे. तो **आनंदाचा कंद** होता व नेहमीं मोठ्यानें पोट धरधरून हसे. **हिंदभूमीवर** त्याचें फार प्रेम होतें व तिला अज्ञानांधकारांतून वर काढण्यासाठीं त्याला तळमळ लागली होती. **राम** प्रत्येक काम एकाग्रतेनें करी.

अहंकाराचा नायनाट व परमेश्वराचा साक्षात्कार करून घेण्यासाठीं त्यानें जन्म घेतला होता. परमेश्वरसाक्षात्कारासाठीं वाटेल तो उपाय योजण्यास त्याची हरकत नव्हती. तो कधींही वादविवाद करीत नसे, कारण सत्याची प्राप्ति वादविवादानें होत नसते तर कळकळीच्या मनःपूर्वक चिंतनानें होते असें त्याचें मत होतें. त्याचें दर्शन होतांच सर्वांचे संशय आणि मतभेद नाहींसे होत. त्याच्या विचारांचा तुमच्यावर पगडा बसला नाहीं तर निदान त्याच्या पवित्रतेचा आणि प्रेमाचा तरी पगडा तुमचे मनावर बसेच बसे."

**स्वामी रामतीर्थांच्या** या रेखाटलेल्या शब्दचित्रानें कोण मोहित होणार नाहीं ? यापेक्षां अधिक मनोहर शब्दचित्र रेखाटणें आम्हांला तरी शक्य नाहीं. अमेरिकनांना तो इतका प्रिय व आदरणीय वाटला, कीं अमेरिकन वर्तमानपत्रांनीं त्याचा फोटो छापून त्या फोटोखालीं **अमेरिकेंत ख्रिस्ताचें आगमन** असे शब्द घातले.

एवढें महत्कार्य सतत अडीच वर्षे करून स्वामी हिंदभूमीकडे यावयास निघाले. वाटेंत ते **ईजिप्त** देशांत उतरले. तेथील पवित्र मशिदींत अस्सल सुंदर पर्शियन भाषेंत त्यांचें कर्णमधुर भाषण ऐकून तेथील मुसलमान-बंधूंना हा आपलाच थोरला धर्मबंधु आहे असें वाटलें. **धर्मज्ञानप्रसारार्थ** स्वामी जरी जगभर प्रवास करीत होते, तरी त्यांचा **आत्मोन्नतीचा** अभ्यास सतत चालूच होता. जपानांत असोत, अमेरिकेंत असोत का आफ्रिकेंतील ईजिप्त देशांत असोत, **आसन, प्राणायाम** व **समाधि** इत्यादि योगाभ्यास त्यांचा सतत चालूच असे. अशा तऱ्हेनें हिंदभूमीचा हा धर्मप्रसारक व तत्त्ववेत्ता, कवि व सुपुत्र सन १९०४ च्या जून महिन्यांत हिंदुस्थानांत परत आला. त्या वेळेला लोकांनीं दिग्विजय करून व लौकिक यश संपादन करून मातृभूमीला परत आलेल्या वीर पुत्राप्रमाणें त्याचें मोठ्या थाटामाटानें स्वागत केलें.

# ८ शेवटचा संचार

इ. स. १९०४ च्या जून महिन्यांत आपला जगाचा प्रवास संपवून स्वामी मातृभूमीला आले असें मागच्या प्रकरणांत सांगितलें. **जपान** व **अमेरिकेंत** लोक पैशाचे पाठीस लागले आहेत, परमेश्वराला विसरले आहेत असें स्वामींनीं पाहिलें; **परमेश्वराला विसरल्यामुळें ते खऱ्या शांतीला, सुखाला व प्रेमाला मुकले आहेत** हेंही त्यांच्या लक्ष्यांत आलें. म्हणून त्यांनीं जपान्यांना आणि अमेरिकनांना **व्यावहारिक वेदान्ताचा** व खऱ्या धर्माचा उपदेश केला. ते आतां मातृभूमीला आले व या हिंदभूमीचें मनानें निरीक्षण केल्यावर त्यांच्या नजरेस असें आलें, कीं **जपान** किंवा **अमेरिकेपेक्षां** निराळ्या तऱ्हेच्या उपदेशाची हिंदभूमीला जरूर आहे.

**जपान** व **अमेरिकेंत** ज्या तीन गोष्टी आहेत, आणि ज्या तीन गोष्टींमुळें आज ते देश वैभवशिखरावर विलसत आहेत, त्या तीन गोष्टी बंधुभगिनींनो, तुम्ही संपादन करा म्हणजे हिंदभूमीचें गतवैभव तिला फिरून प्राप्त होईल असा प्रेमाचा व कळकळीचा उपदेश प्रिय स्वदेशबंधुभगिनींना करावा व मग हिमालयांत एकान्तवासांत कांहीं काळ काढून हा दुर्बळ देह गंगामातेला अर्पण करावा असा स्वामींचा कार्यक्रम होता.

**कार्यक्रमांतील पहिला भाग हिंदसंचार,** म्हणजे आपल्या **हिंदभूमींत** नसलेल्या पण आपल्या सर्व तऱ्हेच्या उन्नतीला अतिशय जरूर असलेल्या तीन गोष्टी म्हणजे १ **सार्वत्रिक शिक्षण,** २ **संघटना** व ३ **सहकार्य** ह्या आपल्यामध्यें पूर्णपणें आणा असा उपदेश करीत सर्व हिंदुस्थानांत व्याख्यानें देत संचार करावयाचा. याची पूर्तता स्वामींनीं जून सन १९०४ पासून ते ऑक्टोबर १९०५ पर्यंत अठरा महिने, मुंबईहून निघून हिंदुस्थानांतील सर्व प्रमुख शहरांत हिंडून व

**कळकळीनें** व **प्रेमानें** भरलेलीं सुबोधपरिप्लुत व्याख्यानें देऊन पुरा केला.

या व्याख्यानांत साधारणपणें हिंदबांधवांना त्यांनीं असें सांगितलें कीं, 'बाबांनो, तुम्हीं **कितीही राजकीय, धार्मिक व सामाजिक चळवळी केल्यात तरी जोंपर्यंत बहुजनसमाज अशिक्षित आणि निरक्षर आहे तोंपर्यंत तुमच्या चळवळींना यश येणार नाहीं.** बहुजनसमाजाला सुशिक्षित करा. शिकलेल्या सुविचारी **तीस कोटि बांधवांचा खरा पाठिंबा मिळवा** म्हणजे तुमच्या सर्व चळवळींना सुयश प्राप्त झालेंच पाहिजे.

**दुसरी गोष्ट सहकार्य.** प्रत्येकजण दुसऱ्यापासून दूर राहून जर कार्य करील तर तें कार्य दुबळें व निरुपयोगी होईल; पण तेंच जर तुम्ही सहकार्य म्हणजे एकजुटीनें, एकमनानें तेंच कार्य कराल तर तें तुमचें कार्य यशस्वी व सुफळदायी होईल. **सहकार्य** ( Co-operation ), **प्रेमयुक्त सहकार्य** आपल्याला प्रत्येक कामांत उत्तम फळ दिल्याशिवाय राहाणार नाहीं.

आपल्याला **तिसरी गोष्ट** हवी ती **संघटना** ( Organization ). आपल्या सर्व चळवळींत संघटनेचा अभाव असतो. सर्व देशांत एकसूत्री व उत्तम नियमबद्ध अशी शिस्तीची संघटना पाहिजे. मुख्य ठिकाण एक ठेवून तेथें मध्यवर्ती संस्था ठेवून तिच्या नियमांनीं शिस्तीनें चालणाऱ्या शाखांचें जाळें सर्व देशभर पसरून दिलें पाहिजे. निरनिराळ्या जातींनीं आणि धर्मांनीं परस्परविरुद्ध दिशेला गमन केल्यास खरी प्रगति व उन्नति कधींही होणार नाहीं.

यासाठीं सर्व देशाला प्रगति व उन्नति मिळवून देणारें **एक ध्येय** सर्व समाजांनीं आपल्यापुढें रात्रंदिवस दिवसाचे चोवीस तास ठेवलें पाहिजे; मग पाहिजे तर प्रत्येक समाजानें आपली वेगळी संघटना करून देशकार्य केलें तरी चालेल. वरील तीन गोष्टी जपान व अमेरिका या देशांत आहेत आणि आपल्या देशांत नाहींत त्या आपणांत आणल्या पाहिजेत.

याशिवाय त्यांच्यांतही नाहीं व आपल्यांत पूर्वी होती पण आतां नाहीं ती गोष्ट आणली पाहिजे, ती म्हणजे सर्व चळवळींना व सर्व कार्यांना **धर्मबुद्धीची जोड**.

तुम्ही म्हणाल, हिंदुस्थानांत नाना धर्म व नाना पंथ आहेत तेव्हां हें येथें जुळावें कसें? याला माझें उत्तर—जरी अनेक धर्म व पंथ अज्ञानी डोळ्यांना दिसत आहेत तरी तीं सर्व एकाच **सनातन प्रेमधर्माचीं रूपें** आहेत. हाच अनुभव मला माझ्या जगाच्या प्रवासांत आला. मी **ख्रिस्ती देवळांत** प्रवचन केलें, तेव्हां ख्रिस्ती बंधूंना वाटलें, कीं हा आपलाच धर्मबंधु आपणाला आपल्या सुधर्माचा सदुपदेश करीत आहे. मी जेव्हां **ईजिप्त** या मुसलमानी देशांत **कैरो** शहराच्या मशिदींत अस्सल पर्शियन भाषेंत धर्मप्रवचन केलें तेव्हां त्या मुसलमान बांधवांना वाटलें, कीं हा आपला धर्मबंधु आपणांस उज्ज्वल **महंमदी धर्माचा** संदेश सांगत आहे.

**बरें, भारतधर्ममहामंडळा**तर्फे मथुरेंत बोललों तेव्हां हजारों हिंदुबांधव प्रेमानें यमुनेच्या वाळवंटांत थंडीवाऱ्याला न जुमानता तासचे तास माझें प्रवचन प्रेमानें ऐकत होते व तेव्हां त्यांनां अमृतपानाचा आनंद झाला असें ते म्हणाले. यावरून काय बोध घ्यायचा तो घ्या. सन्मार्गाला लागून सर्वांना मान्य अशा **सुधर्मानें** व **स्वधर्मानें** एकीनें, समंजसपणें परमेश्वराला स्मरून आणि भक्तीनें त्याचा या स्वकार्यांत आशीर्वाद मिळवून, चिकाटीनें, धडाडीनें, कष्टाळूपणानें सतत धर्मबुद्धि धरून सत्कार्य सद्भावनेनें करीत राहा म्हणजे तो दीनवत्सल दयाघन परमेश्वर आपल्या प्रिय हिंदभूमीला चांगले दिवस दाखवीलच दाखवील; हिंदभूमींतील सर्व शहरच्या स्वामींच्या व्याख्यानांचें सार किती गोड आहे? हें अमृतपान शेवटचें. कारण यानंतर स्वामी हिमालयांत एकान्तवासांत गेले व नंतर त्यांनीं गंगामाईला आपलें शरीर अर्पण केलें.

---

## ९ गंगामातेला देहसमर्पण

**हिंदुबांधवांना शेवटचा प्रेमसंदेश** सांगून निवान्तवाससेवनासाठीं स्वामी प्रियशिष्य नारायणस्वामी यांना बरोबर घेऊन सन १९०५ च्या ऑक्टोबर महिन्यांत हिमालय पर्वतावरील हरिद्वारला गेले. पण हिंदुस्थानच्या शेवटच्या दौऱ्याच्या भयंकर दगदगीनें ते हरिद्वारला आजारी पडले. नंतर बरे झाल्यावर घोर परंतु रमणीय अरण्यांत बरेच दूर प्रवास करून **व्यासमुनींच्या** तपोवनांत ते आश्रम बांधून एकान्तांत सहा महिने राहिले. तेथेंही ते स्वस्थ बसले नाहींत. तेथें त्यांनीं आपल्या पवित्र **वेदांचें अध्ययन** चालू ठेवलें होतें. नंतर तेथून दूर असलेल्या **वसिष्ठ ऋषींच्या आश्रमांत** ते जाऊन राहिले.

हें ठिकाण टिहरीपासून बरेंच दूर आहे. हें ठिकाण फार सुंदर, वनशोभेनें व सुगंधित पुष्पलतांनीं नटलेलें व मधुर फळांनीं लवलेल्या वृक्षांनीं गजबजलेलें आहे. या ठिकाणीं कोणीही गेला तरी त्याचें मन प्रसन्न होऊन परमेश्वरमय होईल यांत शंका नाहीं. असो.

अशा या रमणीय पवित्र महर्षि **वसिष्ठाश्रमांत** स्वामींना भेटण्यासाठीं त्यांचे शिष्य पूरणसिंह, जगत्‌रामजी वगैरे आले होते. त्यांना व नारायणस्वामी यांना स्वामींनीं सप्रेम सदुपदेश केला व आपलें शरीर आतां दुर्बळ झालें असल्यामुळें आपण त्याचा लवकरच त्याग करणार असेंही त्यांनीं सांगितलें.

### शेवटची बोधसुधा

तें ऐकून सर्वांचे डोळे पाण्यानें भरून आले व सर्वांचीं अंत:करणें सद्गदित झालीं. तेव्हां स्वामी म्हणाले, 'वत्सांनो, तुमच्यासारख्या सुज्ञ व परमेश्वरस्वरूपांत मिळूं पाहाणाऱ्या साधकांनीं असें दु:ख करणें योग्य नाहीं. मागें अमेरिकेंतून आल्यावर माझे वडिलांनीं मला

भेटावयास कुठें यावें म्हणून पत्र पाठविलें. त्याला मीं उत्तर दिलें कीं, (**तीर्थ**) **रामाला** त्यांनीं आपल्या हृदयांत भेटावें.

बाळांनो, तुम्ही देखील रामाला अंतःकरणांत पाहाण्यास व भेटण्यास शिकलें पाहिजे. हें दुबळें शरीर म्हणजे कांहीं **राम** नव्हे हें अजून तुम्हांस सांगायला का पाहिजे? बाळांनो, पुसा ते डोळे आणि लागा पाहूं माझेबरोबर नेहमींप्रमाणें हसायला! असो. शेवटीं सुशिष्य **पूरणसिंह** यांनीं जड अंतःकरणानें स्वामींचा निरोप घेतला आणि जड पावलांनीं व श्रमिष्ट मनानें त्यांनीं आपल्या घरचा रस्ता धरला. शिष्य गेल्यावर पट्टशिष्य नारायणस्वामी हेच स्वामी रामतीर्थांजवळ राहिले.

## स्वामींचें काव्यलेखन

वसिष्ठाश्रमांत हवा न सोसल्यामुळें व वाईट अन्नामुळें स्वामी वारंवार आजारी पडूं लागले व फार अशक्त झाले. यामुळें नारायणस्वामींनीं हात जोडून विनंति केली कीं, 'स्वामी, आपण येथून निघून टिहरीजवळ जावें म्हणजे आपली प्रकृति बरी होईल.' ही विनंति स्वामींनीं मान्य केली. नंतर टिहरीजवळ गंगातीरावर **केशवाश्रम** नांवाच्या पवित्र स्थळीं टिहरीच्या महाराजांनीं मुद्दाम बांधून दिलेल्या पर्णकुटिकेंत एकान्तवासासाठीं स्वामी जाऊन राहिले, तेव्हां त्यांची प्रकृति जराशी सुधारली. स्वामींच्या जवळच सुमारें दोन मैल दूर असलेल्या एका गुहेंत नारायणस्वामी जाऊन राहिले.

स्वामींना हा जो एकान्त काळ लाभला त्यांत त्यांनीं पुष्कळ काव्यरचना केली. त्यांनीं पूर्वी **वानप्रस्थाश्रमांत** केलेल्या काव्यांत आणि या काव्यांत फार अंतर आहे. त्यांच्या या शेवटच्या काव्यांत मी-तूंपणा मुळींच राहिलेला नाहीं, यामुळें यांत त्यांचें नांव कुठेंच आलेलें नाहीं हीं काव्यें समाधिसुख अनुभवतांना लिहिलेलीं असल्यामुळें समाधिसुखाच्या वर्णनानें ओथंबलेलीं आहेत. असो.

स्वामी ज्याप्रमाणें काव्यलेखन करीत असत, त्याचप्रमाणें या अखेरच्या एकान्तवासांत म्हणजे **केशवाश्रमांत** धर्मनिबंधही लिहीत असत. अशा तऱ्हेचा एक फार सुंदर धर्मनिबंध ते लिहीत होते. त्या निबंधाचें नांव '**स्वानंदसाम्राज्य**'. हाच त्यांचा शेवटचा निबंध. या निबंधाचा शेवटचा भाग त्यांनीं ता. १७ ऑक्टोबर, १९०६ रोजीं पहाटेस लिहिला व मग समाधि लावली.

नंतर अकरा वाजल्यावर समाधिविसर्जन करून, आपला स्वयंपाकी भोलानाथ याचेबरोबरच ते गंगेवर स्नानास गेले. तो दिवस आश्विन वद्य अमावास्येचा म्हणजे महापर्वाचा होता. स्वामी स्नानासाठीं गंगेंत उतरले, व गळ्याइतक्या पाण्यांत उभे राहून अंग चोळून स्नान करीत होते, इतक्यांत त्यांच्या पायाखालचा दगड निसटला व ते वाहात वाहात एका भोंवऱ्यांत सांपडले. भोंवऱ्यांतून अतिशय कष्ट करून ते बाहेर पडले. पण त्या कष्टांनीं ते अगदीं थकून गेले. आपलें शरीर किती दुबळें झालें आहे हें त्यांना पूर्वीं कळलेंच होतें व यामुळेंच आपण त्याचा लवकरच त्याग करणार असें ते आपल्या शिष्यांजवळ बोलले होते.

## भविष्यकथन

'स्वानंदसाम्राज्य' म्हणून जो सुंदर धर्मनिबंध त्यांनीं शेवटच्या दिवशीं सकाळीं संपविला होता, त्याच्या शेवटीं ते लिहितात— 'ब्रह्मा, विष्णु, शिव, इंद्र, गंगा भारत, हे मृत्यो, हें शरीर पाहिजे तर बेलाशक घेऊन जा!' या त्यांच्या वाक्यावरून ते मरण्याला तयार झाले होते हें सिद्ध होतें. असो. शेवटीं आलेल्या थकव्यानें आपल्या शरीराच्या दुबळेपणाची पूर्ण कल्पना स्वामींना आली. लगेच त्यांनीं योग्याला उचित असें सिद्धासन, मांडी घालून घातलें, प्राण ब्रह्मांडीं नेला व ॐकाराचा घोष करीत आपलें शरीर गंगामातेला समर्पण केलें. नंतर गंगामातेनें **संतसमागम** व्हावा म्हणून आपल्या पोटांत तें शरीर जसेंच्या तसें धारण

केलें व सातवे दिवशीं तें पवित्र शरीर शिष्यजनांच्या स्वाधीन केलें. नंतर एका सुंदर पेटींत घालून तें शरीर शिष्यवरांनीं पुनः गंगामातेला अर्पण केलें.

---

## १० रामतीर्थ सूक्तिसुधा

१ आपल्या मित्रांत एखादा दोष आढळतांच त्याच्या अनेक चांगल्या गुणांविषयींचा आदर टाकून देऊं नका.

२ दुसऱ्याचे दोष काढण्यांत खर्च होणारी वेळ व शक्ति, आपले अंगांत अधिक गुण आणण्याचे कामीं खर्च करा.

३ उज्ज्वल व हितकर सार्वजनिक कामगिरी करणाऱ्या पुढाऱ्याचे खासगी वर्तनांतील दोष काढीत बसूं नका. कांटे आहेत म्हणून कांहीं गुलाबाचें फूल कोणी फेंकून देत नाहीं.

४ संतांवर प्रेम कोणीही करील. पण पापी पतितांना प्रेमानें उद्धरील तोच महात्मा.

५ जोंपर्यंत प्रत्येक मनुष्य दुसऱ्याचे दोष काढण्यांत गुंग झाला आहे तोंपर्यंत राष्ट्रांत एकी होण्याचें नांव काढूं नका.

६ दुर्जनांवर भुंकत बसण्यापेक्षां सज्जनांचें स्तुतिस्तोत्र गाणें अधिक हितावह आहे.

७ ज्या घरांत दिवा नाहीं, त्या घरांत चोर शिरतो, त्याचप्रमाणें ज्या मनांत देवरूपी दिवा नाहीं, त्या मनांत वाईट विचाररूपी चोर शिरतात.

८ वादे वादे जायते कंठशोषः।

९ वादविवादानें दुसऱ्याला जिंकण्यापेक्षां प्रेमानें जिंकणें अधिक सोपें.

१० देवाच्या सर्व नांवांत **हरि** हें नांव मला अधिक आवडतें; कारण हरि म्हणजे आपलें मन चोरून नेतो तो.

११ ईश्वरचिंतनांत निमग्न व्हा, म्हणजे विषयसुखाची आठवण देखील होणार नाहीं.

१२ प्रेम करणारावर सर्व प्रेम करतात.

१३ प्रेम आणि सत्य हीं दोनही एकत्र नांदतात; सत्य नाहीं तेथें प्रेमही नाहीं, आणि प्रेम नाहीं तेथें सत्य नाहीं.

१४ अंगिकारलेल्या धंद्यावर किंवा कामावर प्रेम करा म्हणजे तो धंदा किंवा तें काम तुम्हाला उत्तम तऱ्हेनें करतां येईल.

१५ परमेश्वर म्हणजे प्रेम. प्रेमाशिवाय परमेश्वर नाहीं.

१६ श्रीकृष्ण, बुद्ध, महंमद, खिस्त व झरतुष्ट्र या परमेश्वराच्या पंचप्राणांना प्रेरणा देणारी शक्ति **प्रेम.**

१७ मनांत प्रेमाला नांदूं द्या म्हणजे कोणतीही परिस्थिति तुम्हाला सुखकर वाटेल.

१८ सर्व व्यवहारज्ञान भगवान् श्रीकृष्णांनीं एका श्लोकांत आणून ठेवलें आहे, तो श्लोक हा —

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।**
**मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥**

**अर्थ** — तुझा अधिकार फक्त कर्म करण्याचा आहे. कर्मांच्या फलाकडे पाहाण्याचें तुला कारण नाहीं. फलाची इच्छा कधींही करूं नको. उलटपक्षीं आळसानें सुस्त पडूनही राहूं नको.

१९ जगाशीं एकरूप होऊन जो काम करतो, त्याला सर्व जग मदत करतें.

२० यज्ञांत अग्निनारायणाचे तोंडांत महाग तुपाचा लोटा ओतण्यापेक्षां भुकेलेल्या गरिबांच्या जठराग्निनारायणांना जाड्याभरड्या भाकरीचे तुकडे अर्पण करणें अधिक चागलें.

२१ सर्व दानांपेक्षां विद्यादान अधिक पुण्यकारक आहे.

२२ ही खरी प्रभुसेवा, जनसेवा, मान्य खरोखरि देवा ।

२३ तुमचें नशीब बनविणारे तुम्हीच.

२४ वरपांगी ऐक्य घडवून आणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. अंतःकरणांचें ऐक्य झालें तरच कार्यसिद्धि होते.

२५ बालकांना लष्करी शिक्षण द्या, म्हणजे त्या योगानें धैर्य, सचोटी, स्वार्थत्याग इत्यादि सद्गुण त्यांचे अंगांत येतील.

२६ जनतेंत प्रेम व ऐक्य उत्पन्न करण्यासाठीं सार्वजनिक संगीत मिरवणुकी व भजनी मेळे काढावे.

२७ स्त्रीशिक्षण, बालशिक्षण व मजूरशिक्षण यांची हेळसांड करणें म्हणजे राष्ट्रवृक्षाच्या मुळावरच घाव घालण्यासारखें आहे.

२८ जुन्या सणांचें रूपांतर करून ते सर्व धर्मांच्या लोकांना एकत्र जमून साजरे करतां येतील असें त्यांना नवीन रूप द्यावें.

२९ निरनिराळ्या शहरीं नवीन प्रार्थनामंदिरें बांधावीं व त्यांत सर्व लोकांना प्रार्थना करण्याची मोकळीक असावी.

३० हिंदबांधवांनीं जपान व अमेरिका यांचेपासून व्यावहारिक ज्ञान व नूतन शास्त्र आणि कला यांचें शिक्षण अवश्य घ्यावें.

३१ बी. ए., एम्. डी. वगैरे पदव्या युनिव्हर्सिटी देईल, पण 'शूर' किंवा 'भेकड' ही पदवी तुम्ही स्वतःच घ्यावयाची आहे.

३२ आम्हाला जोमदार शांति हवी, स्मशानशांति नको.

३३ आपलें शरीर ही देवानें ठेवावयास दिलेली जिन्नस आहे. तिचा मालक देव आहे. त्याला आवडेल अशीच ही जिन्नस वापरली पाहिजे.

३४ सर्व जगाशीं फटकून वागण्याचे दिवस गेले. विमानें व आगबोटी यांनीं दूरचे देश एकमेकांच्या अगदीं जवळ आणले आहेत.

३५ हिंदुस्थानांत उपाशीं मरण्यापेक्षां जगाच्या पाठीवर वाटेल तिथें जा व नेकीनें पोट भरा.

३६ परदेशांत गबर झालेत तर वाटल्यास परत या, पोटापुरतेंच तेथें मिळत असेल तर तेथें कायम व्हा. व तेथेंही पोटाला मिळण्याची अक्कल किंवा कर्तबगारी नसेल तर खुशाल अरबी समुद्रांत बुडून जा.

३७ जेथील लोक परदेशांत राहावयास गेले ते देश गबर झाले, असेंच इतिहास सांगतो.

३८ संशयखोर मनुष्याला शांति आणि संपत्ति कधींच भेटत नाहीं.

३९ धडाकेबाजाला जग बाजूस होऊन वाट देतें.

४० नदीप्रमाणें नेहमीं काम करीत राहा, नेहमीं प्रगमनशील व्हा म्हणजे तुम्ही धंद्यांत यशस्वी व्हाल.

४१ जगाला उपयुक्त कामगिरीरूपी किंमत द्याल तरच जग पोटाला अन्न देईल.

४२ ज्या कामांत आपण दंग होऊन स्वतःला विसरतों तें उत्तमोत्तम होतें.

४३ हातीं घेतलेलें काम प्रेमानें करा म्हणजे तें उत्तम होणारच होणार.

४४ सहकार्य म्हणजे प्रेमाचें प्रदर्शन.

४५ देवानें तुम्हाला आनंदरूप बनविलें आहे, म्हणून तुम्ही नेहमीं आनंदी राहाण्यास शिकलें पाहिजे.

४६ फक्त कर्तव्यावर लक्ष ठेवा म्हणजे यश हटकून मिळेल.

४७ गेलेले वाईट दिवस आठवून रडत बसूं नका. पुढें येणारे दिवस भयंकर येणार असें म्हणून भेदरून जाऊं नका. जवानमर्दाप्रमाणें चालू असलेला वर्तमानकाल कर्तबगारीनें भरून काढा.

४८ भविष्यकालाबद्दलची भीतीच, वर्तमानकालांत हटकून अपयश देते.

४९ निराशा म्हणजे नेभळेपणा. द्या तर तिला एकदां झुगारून !

५० सिंह स्वतःच्या हिंमतीवर जंगलाचा राजा बनतो हें ध्यानांत ठेवा!

५१ मन लावून काम करणें म्हणजेच खरें विश्रांतिसुख अनुभवणें.

५२ योगसाधनासाठीं जंगलांत जावयाला नको. आपल्या कामांत गर्क होणें म्हणजेच योगी बनणें.

५३ वेदान्ताप्रमाणें व्यवहारांत वागेल त्याला लक्ष्मी आणि यशोदेवता माळ घालतील.

५४ परमेश्वर माझा पाठीराखा आहे या श्रद्धेनें काम करा म्हणजे तें उत्तम होईल व तें करतांना तुम्हाला कष्ट वाटणार नाहींत.

५५ शरीर सतत कामांत गुंतवा व मन शांत ठेवा असें वेदान्त सांगतो.

५६ कामावर लक्ष ठेवून काम करा, नफ्यातोट्यावर लक्ष देऊन काम करूं नका असें वेदान्त सांगतो.

५७ गिऱ्हाइकांचें हित तेंच माझें हित असें मानणारा दुकानदार यशस्वी होतो. ही बुद्धि देणारी देवता म्हणजेच प्रेम.

५८ सर्वांचें ज्यांत कल्याण त्यांत आपलें कल्याण असें माना, म्हणजे सर्व जग तुमच्या मदतीला धावेल.

५९ आपलें कर्तव्य एकनिष्ठेनें करा. मला इतर लोक मदत करतील कीं नाहीं ही विवंचना करूं नका. ते मदत करणारच, त्यांनीं मदत केलीच पाहिजे.

६० आपली सावली पकडण्यासाठीं आपण तिचा पाठलाग करूं लागलों कीं ती आपली पुढेंच धावत सुटते, हातीं लागत नाहीं. पण आपण सावलीकडे पाठ फिरवली व सूर्याकडे जाऊं लागलों तर ती

आपल्या पाठोपाठ येते. त्याचप्रमाणें संपत्ति, वैभव, मानमान्यता यांच्या मागें धावा कीं तीं तुमच्यापासून दूर जातील, मुळींच हातीं लागणार नाहींत. पण त्यांच्याकडे पाठ फिरवा व तुमच्या अंतःकरणांत असलेल्या आत्मारूपी दिव्य सूर्याकडे तोंड फिरवा म्हणजे तीच संपत्ति, तेंच वैभव, तीच मानमान्यता तुमच्या हात धुऊन पाठीस लागेल.

६१ तुमचा भविष्यकाळ तुम्हीं बनवाल, तसा बनेल हें लक्षांत ठेवा.

६२ चाबकाच्या कोरड्याला भिऊन कामाला लागणाऱ्या विगाऱ्या-प्रमाणें कामाला लागूं नका. मजेखातर, जरा व्यायाम व्हावा म्हणून किंवा घटकाभर करमणूक व्हावी म्हणून काम हातीं घेणाऱ्या थोर राजाप्रमाणें कामास लागा.

६३ मनांत भीतीला बिलकूल थारा देऊं नका, म्हणजे कोणीही तुमचें वाकडें करूं शकणार नाहीं. हिमालयांत एकदां पांच क्रूर अस्वलें रामतीर्थांवर धावून गेलीं, पण त्यांनीं त्यांना मुळींच त्रास दिला नाहीं, ही गोष्ट हेंच सिद्ध करते.

६४ 'नर करणी करे तो नरका नारायण बने' असें वेदान्त शिकवितो.

६५ दुसऱ्याच्या मदतीवर विसंबून राहा कीं अपयश ठरलेलेंच.

६६ आपण एक निरुपयोगी क्षुद्र प्राणी आहों असें मानूं नका, आपण परमेश्वराचे अंशावतार आहों असें माना.

६७ धडाडीनें कामधंदा करून हातापायांना तत्पर आणि तापट बनवा पण डोकें मात्र नेहमीं थंड ठेवा.

६८ आपला धंदा म्हणजे एक अत्यंत पवित्र कर्तव्य आहे असें माना.

६९ **खरें शिक्षण**—ज्या शिक्षणानें लोकांना शेतें जास्त सुपीक बनवतां येतील, खाणींतून जास्त उत्पन्न काढतां येईल, व्यापार जास्त भरभराटीस आणतां येईल, शरीरें जास्त चपळ बनवितां येतील, मनें जास्त स्वतंत्र बनवितां येतील, अंतःकरणें जास्त पुण्यशील बनवितां

येनील, उद्योगधंद्याला अधिक विविधता आणतां येईल आणि राष्ट्रांत अधिक ऐक्य घडवून आणतां येईल तेंच खरें शिक्षण.

७० चुकीची शिक्षणपद्धति— जें शिक्षण मोठमोठीं शास्त्रवचनें म्हणून दाखवून आपलें पांडित्यप्रदर्शन करण्यास शिकवितें, पवित्र शास्त्रांतील भागाचे अर्थाची ओढाताण आणि शब्दच्छल करण्यास शिकवितें, व्यवहारांत कधींही न लागणारे विषय शिकवितें तें खरे शिक्षणच नव्हे.

७१ आपण ज्या तऱ्हेचें अन्न खातों, त्या प्रकारचे आपले विचार व आचार बनतात.

७२ भाजीपाला, धान्यें, फळें व मुळें यांपासून शरीर व मन यांचे पोषणास जरूर असलेलीं सर्व द्रव्यें मिळतात. यासाठीं यांचाच उपयोग खाण्याच्या कामीं करावा.

७३ सामाजिक, राजकीय, औद्योगिक, किंवा दुसरी कोणतीही चळवळ हिंदुस्थानांत सर्वत्र प्रसृत करावयाची असल्यास तिला धर्माचें रूप दिलें पाहिजे.

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय ठाणे

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र. 38499 नों दि
वि. वा.

## ११ पुनरागमनाय च

बालमित्रांनो, अत्यंत उज्ज्वल, अत्यंत पवित्र, अत्यंत बोधपर व अत्यंत आदरणीय असें

## सुबोध रामतीर्थ चरित्र

आतांपर्यंत मीं तुम्हाला कथन केलें. या कथनांत तुम्ही आणि मी अगदीं तल्लीन झालों होतों व आनंदसमुद्रांत पोहत होतों. तें पोहणें संपलें. यामुळें वाईट वाटणें साहजिक आहे. **स्वामी रामतीर्थ** म्हणजे **प्रभुरामचंद्रांचे** प्रेमळ भक्त, संत कविशिरोमणि **तुळशीदास** यांचे वंशज. तेव्हा त्यांचें चरित्र **प्रभुरामचंद्रचरित्राप्रमाणें** म्हणजे **रामायणाप्रमाणें** बोध आणि रंजन यांनीं भरलेलें झालें आहे यांत कांहीं आश्चर्य नाहीं. संपलें. बाळांनों, हें **आधुनिक रामायण संपलें.** 'सुजनचरित्रें परमपवित्रें सादर वर्णावीं' अशी थोर विभूतींची आज्ञा आहे. ती मला व तुम्हांला मान्य आहे. मला संतचरित्रकथनाची आवड आहे व तुम्हांला संतचरित्र-श्रवणाची आवड आहे. यामुळें जरी आपण आतांपुरता एकमेकांचा निरोप घेत आहों तरी हें आमचें निरोप घेणें व निरोप देणें तात्पुरतेंच असून '**पुनरागमनाय च**' आहे. असो, लागा तुम्ही आतां अभ्यासाला.

IRBK-0103459

IRBK-0103459